रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २८८
www.ramprahar.com

◆ गुरुवार, ७ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

# पेन्शनचा विषय अखेर मार्गी!

## सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची कार्यपद्धती जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाने राष्ट्रीय निवृत्तीवेतन प्रणाली (एनपीएस) अंतर्गत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू करण्याची कार्यपद्धती बुधवारी (दि.६) एका परिपत्रकाद्वारे जाहीर केली. या निर्णयामुळे १ मार्च २०२४पासून सेवेत असलेल्या आणि या योजनेचा पर्याय निवडणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या योजनेनुसार ज्या कर्मचाऱ्यांची सेवा २० वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त झाली आहे, त्यांना त्यांच्या शेवटच्या वेतनाच्या ५०% निवृत्तीवेतन आणि त्यावरील महागाई वाढ लागू होईल. १० ते २० वर्षांच्या दरम्यान सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवेच्या प्रमाणात निवृत्तीवेतन दिले जाईल. या योजनेंतर्गत किमान निवृत्तीवेतन ७,५०० रुपये निश्चित करण्यात आले असून १० वर्षांपेक्षा कमी सेवा असलेल्यांना हे निवृत्तीवेतन लागू होणार नाही.

पात्र आणि इच्छुक कर्मचाऱ्यांनी या सुधारित योजनेत सहभागी होण्यासाठी आपला पर्याय ३१ डिसेंबर २०२६पर्यंत संबंधित कार्यालय किंवा विभाग प्रमुखांकडे सादर करणे आवश्यक आहे. **(पान २ वर..)**

### 'त्या' कर्मचाऱ्यांनाही राज्य सरकारचा दिलासा

योजना केवळ शासकीय कर्मचाऱ्यांपुरती मर्यादित नसून जिल्हा परिषद कर्मचारी, अनुदानित शैक्षणिक संस्था, कृषी आणि बिगर–कृषी विद्यापीठांमधील एनपीएसधारक कर्मचाऱ्यांनाही लागू करण्यात आली आहे तसेच या कर्मचाऱ्यांना ३१ मार्च २०२३च्या शासन निर्णयानुसार सेवानिवृत्ती उपदान (ग्रॅज्युटी)देखील लागू राहील, मात्र राजीनामा देणाऱ्या कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यांना केवळ मूळ एनपीएसचे लाभ मिळतील.

## शासकीय हिंदी भाषा परीक्षेला स्थगिती



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी होणारी हिंदी भाषेची परीक्षा आता रद्द करण्यात आली आहे. राज्याचे मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी बुधवारी (दि.६) प्रसारमाध्यमांशी बोलताना ही माहिती दिली.

राज्यात शासकीय कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी २८ जूनला हिंदी भाषेची परीक्षा घेण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली होती. राजपत्रित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ही परीक्षा द्यावी लागणार होती, जी रद्द करण्यात आली आहे. या संदर्भात मंत्री उदय सामंत यांनी सांगितले, मला माध्यमांमधूनच कळले की मराठी भाषा संचालनालयाकडून अशा प्रकारची परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यानंतर मी आता आमचे प्रधान सचिव किरण कुलकर्णी यांच्याशी चर्चा केली. हिंदी भाषेची परीक्षा घेण्याची घोषणा करण्यात आली होती, मात्र आता त्या परीक्षेला स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

"भविष्यात हिंदी भाषेची परीक्षा आवश्यक आहे का? हे मी राज्याचा मराठी भाषेचा मंत्री म्हणून स्वतः पडताळून पाहणार आहे. त्यानंतर जर ही परीक्षा आवश्यक असेल तर ही परीक्षा घेऊ, अन्यथा परीक्षा न घेण्याचा निर्णय आम्ही घेणार आहोत", असेही मंत्री सामंत यांनी यावेळी स्पष्ट केले.

## पेणच्या भोगावती नदीत रिक्षा कोसळून चालकाचा मृत्यू, प्रवासी गंभीर जखमी

**पेण : प्रतिनिधी**

पेण येथील भोगावती नदीपात्रात रिक्षा कोसळून चालकाचा मृत्यू, तर प्रवासी गंभीर जखमी झाल्याची घटना बुधवारी (दि.६) घडली. अपघातानंतर घटनास्थळी मोठी गर्दी झाली होती.

पेण–खोपोली मार्गावर भोगावती नदीजवळील हनुमान मंदिर परिसरात हा अपघात घडला. यामध्ये रिक्षाचालक एकनाथ किसन किंजवडे (वय ५३, रा. कामार्ली, ता. पेण) यांचा जागीच मृत्यू झाला, तर प्रवासी भूषण पाटील (रा. कराडे, रसायनी, ता. पनवेल) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर पेण येथील म्हात्रे हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. या प्रकरणी पेण पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.

## निवडक

### काँग्रेसने मारली पलटी; आता 'टीव्हीके'ला पाठिंबा

**चेन्नई :** तमिळनाडूमध्ये सत्तास्थापनेच्या हालचालींना वेग आला असताना काँग्रेसने द्रमुक पक्षाबरोबर असलेली पाच दशकांपासूनची आघाडी मोडली असून विजय जोसेफच्या तमिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) पक्षाला जाहीर पाठिंबा दिला आहे. टीव्हीकेला सर्वाधिक १०८ जागा मिळाल्या, मात्र बहुमतासाठी लागणाऱ्या ११८ जागांचा टप्पा गाठण्यासाठी त्यांना १० आमदारांची आवश्यकता आहे. दरम्यान, विजय जोसेफ गुरुवारी (दि.७) मुख्यमंत्रिपदी शपथ घेतील.

### देशात इंधनाचा पुरवठा सुरळीत; पेट्रोल–डिझेल, एलपीजी दर स्थिर

**नवी दिल्ली :** पेट्रोल–डिझेल आणि एलपीजीबाबत सरकारने महत्त्वाची अपडेट दिली आहे. घरगुती एलपीजी गॅसच्या दरात कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. त्याचसोबत पेट्रोल आणि डिझेलच्या दरातही वाढ होणार नसल्याची माहिती पेट्रोलियम मंत्रालयाने दिली. दर स्थिर असल्यामुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळाला आहे.

## डिजिटल अरेस्टची भीती दाखवून तब्बल २७ लाखांची फसवणूक

■ मुरूडच्या महाळुंगे खुर्द येथील प्रकार; गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**



मुरुड तालुक्यातील महाळुंगे खुर्द येथे ऑनलाइन फसवणुकीचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. अज्ञात आरोपींनी व्हॉट्सअ‍ॅप व्हिडीओ कॉलच्या माध्यमातून डिजिटल अरेस्टची भीती दाखवून एका व्यक्तीकडून तब्बल २७ लाख रुपये उकळले. या प्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार महाळुंगे खुर्द येथे राहणाऱ्या फिर्यादीला अज्ञात व्यक्तीने १७ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजल्यापासून ते ३० एप्रिल रोजी सकाळी ११ वाजेपर्यंत वारंवार व्हॉट्सअ‍ॅप व्हिडीओ कॉल केले. आरोपीने स्वतःला उत्तर प्रदेश एटीएस विभागातील अधिकारी असल्याचे खोटे सांगत फिर्यादीला मनी लॉण्डरिंग व बॉम्बस्फोट प्रकरणात आरोपी असल्याचे भासवले तसेच अटक करण्याची भीती दाखवून फिर्यादीला मानसिक दबावाखाली ठेवत कोणाशीही संपर्क न करण्याच्या सूचना दिल्या.

यानंतर आरोपींनी "केसमधून बाहेर काढतो" असे सांगत विविध बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास सांगितले. त्यानुसार फिर्यादीकडून एकूण २७ लाख रुपये वेगवेगळ्या खात्यांमध्ये ट्रान्सफर करण्यात आले.

या प्रकरणी व्हॉट्सअ‍ॅप व्हिडीओ कॉल करणाऱ्या अज्ञात व्यक्तीसह इतर संबंधितांविरोधात रेवदंडा पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता कलम ३१६(२), ३१८, ३(५) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० (२००८ सुधारणा) अंतर्गत कलम ६६(सी) व ६६(डी) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास निरीक्षक किशोर साळे करीत आहेत.

थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांची आज पुण्यतिथी

# उलवे नोडमध्ये विविध समाजोपयोगी कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती, कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते, थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३८व्या पुण्यतिथीनिमित्ताने गुरुवारी (दि.७) सायंकाळी ६ वाजता उलवे नोडमध्ये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विविध समाजोपयोगी कार्यक्रम होणार आहेत.


या अनुषंगाने आयोजित पनवेल तालुकास्तरीय "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२६"मध्ये प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या ग्रामपंचायतीला एक लाख रुपये, द्वितीय ५० हजार रुपये, तृतीय २५ हजार रुपये, तर उत्तेजनार्थ दोन ग्रामपंचायतींना प्रत्येकी ११ हजार रुपये आणि सर्व विजेत्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

उलवे नोड सेक्टर १२मधील रामशेठ ठाकूर मैदान येथे जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या समारंभाला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, महापौर नितीन पाटील, रायगड जि.प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, **(पान २ वर..)**



**उलवे नोड :** थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित सामाजिक कार्यक्रमासंदर्भातील अंतिम नियोजन आढावा बैठक बुधवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीस ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, महापौर नितीन पाटील, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, 'दिबां'चे पुत्र अतुल पाटील, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव नगरसेवक परेश ठाकूर, संस्थेचे सचिव एस.टी. गडदे, संचालक अनिल भगत, संजय भगत, भाऊशेठ पाटील, रत्नप्रभा घरत, वसंत पाटील, ज्येष्ठ नेते जयंत पगडे, पं.स. उपसभापती भूपेंद्र पाटील, मंडळ अध्यक्ष नगरसेवक दशरथ म्हात्रे, विकास घरत, जि.प. सदस्य निकिता खारकर, पं.स. सदस्य जिज्ञासा कोळी, वितेश म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, मयुरेश नेतकर आदी उपस्थित होते.




स.न.वि.वि

आपणांस कळविण्यात येते की, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल आणि रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवार, दिनांक ७ मे २०२६ रोजी सायंकाळी ठीक ०६.०० वाजता "स्व. जनार्दन आत्माराम भगत साहेब" यांची ३८ वी पुण्यतिथी कार्यक्रम रामशेठ ठाकूर मैदान, प्लॉट नं.६, सेक्टर १२, उलवे नोड, नवी मुंबई येथे आयोजित केला असून सदर कार्यक्रमासाठी खालील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

समारंभ अध्यक्ष

मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब
माजी खासदार व चेअरमन ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल

प्रमुख पाहुणे

मा. श्री. प्रशांत ठाकूर — आमदार – पनवेल विधानसभा तथा अध्यक्ष, रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल
मा. श्री. महेश बालदी — आमदार – उरण विधानसभा
मा. श्री. नितीन पाटील — महापौर, पनवेल महानगरपालिका
मा. श्री. मंगेश वाकडीकर — अध्यक्ष, रायगड जिल्हा परिषद
मा. श्री. जे. एम. म्हात्रे — माजी नगराध्यक्ष, पनवेल
मा. श्री. अविनाश कोळी — अध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा भाजपा
मा. श्री. महेंद्र घरत — अध्यक्ष, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी
मा. श्री. अरूणशेठ भगत — अध्यक्ष, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल तथा अध्यक्ष, पनवेल तालुका भारतीय जनता पार्टी
मा. श्री. वाय. टी. देशमुख — उप कार्याध्यक्ष, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल
मा. सौ. प्रमिला पाटील — उपमहापौर, पनवेल महानगरपालिका
मा. सौ. रंजना वासकर — सभापती, पंचायत समिती पनवेल
मा. श्री. भुपेंद्र पाटील — उपसभापती, पंचायत समिती पनवेल
मा. श्री. अनिल पांडूरंग भगत — कार्यकारी मंडळ सदस्य, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल
मा. श्री. प्रकाश जनार्दन भगत — कार्यकारी मंडळ सदस्य, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल
मा. श्री. संजय जनार्दन भगत — कार्यकारी मंडळ सदस्य, ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल संचालक, रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ,पनवेल
मा. श्री. वसंत हरी पाटील — सभासद, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

रायगड आणि नवी मुंबईमधील तमाम बंधू–भगिनींचे प्रेरणास्त्रोत असणाऱ्या स्वर्गीय जनार्दन आत्माराम भगत साहेबांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन करण्यासाठी हे आग्रहाचे निमंत्रण

आपले स्नेहांकित

श्री. परेश ठाकूर — सचिव, श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल; कार्यकारी मंडळ सदस्य, ज.भ.शि.प्र.संस्था, पनवेल; मा. गटनेते, पनवेल महानगरपालिका, पनवेल
प्राचार्य डॉ. सिध्देश्वर तुकाराम गडदे — सचिव, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल

सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था, पनवेल आणि सर्व कर्मचारी वृंद श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल

# महाराष्ट्रात वैद्यकीय क्षेत्र बळकट करण्यासाठी नवे पाऊल!

## 'जायका'कडून तीन हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या विकास प्रवासात विविध क्षेत्रांत मोलाचे योगदान देणाऱ्या (जायका) या आंतरराष्ट्रीय संस्थेसोबत आता वैद्यकीय क्षेत्रातही सहकार्याची नवी दिशा निर्माण होणार आहे. राज्यातील वैद्यकीय सेवा अधिक सक्षम आणि आधुनिक करण्यासाठी 'जायका' महाराष्ट्रासोबत भागीदारी करण्यास उत्सुक असून तीन हजार ७०८ कोटींची वित्तीय सहाय्यता घेण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.




मुख्यमंत्री म्हणाले की, यापूर्वी आसाम आणि तामिळनाडूसारख्या राज्यांमध्ये यशस्वी प्रकल्प राबविल्यानंतर जायका आता महाराष्ट्रातही 'मेडिकल केअर सिस्टम' मजबूत करण्यासाठी पुढाकार घेत आहे. विशेषतः राज्याच्या वैद्यकीय शिक्षण विभागासोबत समन्वय साधून हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रस्तावित भागीदारीत विविध महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. यामध्ये सध्याच्या शासकीय वैद्यकीय, पॅरामेडिकल आणि नर्सिंग महाविद्यालयांच्या पायाभूत सुविधांचा विकास, आधुनिक निदान (डायग्नोस्टिक) यंत्रणा अधिक सक्षम करणे विशिष्ट आजारांसाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स' उभारणे, नवीन नर्सिंग आणि पॅरामेडिकल महाविद्यालयांची स्थापना करून प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे, आरोग्य व्यवस्थापन प्रणाली अधिक कार्यक्षम करण्यासाठी सहाय्य यांचा समावेश आहे. राज्य सरकारच्या वतीने या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला असून वैद्यकीय शिक्षण विभागाने आवश्यक ते सर्व सहकार्य देण्याची तयारी दर्शविली आहे.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात यापूर्वीच शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत. याशिवाय जळगाव, लातूर, बारामती, मिरज, कोल्हापूर, नंदूरबार व गोंदिया या सात जिल्ह्यांमध्ये १०० प्रवेश क्षमतेचे शासकीय बीएस्सी नर्सिंग विद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय व संलग्नित रुग्णालयांच्या पायाभूत सुविधांकरिता तसेच अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध व्हावी याकरिता 'स्ट्रेन्थनिंग टर्शरी हेल्थ केअर डिलीव्हरी, मेडिकल एज्युकेशन सिस्टीम ॲण्ड नर्सिंग सिस्टीम इन महाराष्ट्र' हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी जपानच्या इंटरनॅशनल को ऑपरेशन एजन्सीकडून तीन हजार ७०८ कोटींचे वित्तीय सहाय्य उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. त्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या प्रकल्पात वर्धा, पालघर, रत्नागिरी, अहिल्यानगर या नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी तसेच मुंबईतील जीटी, सेंट जॉर्ज, धुळे, सोलापूर, अंबेजोगाई, अकोला, आयजीएमसी नागपूर, रत्नागिरी, पालघर, धाराशिव येथील नर्सिंग महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करण्यात येणार आहे, तर बारामती, सांगली (मिरज), कोल्हापूर येथील नर्सिंग महाविद्यालयांचे बांधकाम करण्यात येणार आहे. याशिवाय अहिल्यानगर, भंडारा, गडचिरोली, हिंगोली, जालना, मुंबई, नाशिक, परभणी, सातारा, पालघर, रत्नागिरी, वर्धा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी यंत्रसामुग्री उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे भारत-जपान शैक्षणिक आदान प्रदान कार्यक्रमांतर्गत रूग्णालय व्यवस्थापन व प्रशासन मानवसंसाधन विकास यांच्या क्षमता वृध्दीसाठी तरतूद करण्यात येणार आहे.

या भागीदारीमुळे महाराष्ट्रातील आरोग्यसेवा अधिक दर्जेदार, सुलभ आणि आधुनिक होईल .त्यामुळे राज्यातील नागरिकांना उत्तम वैद्यकीय सुविधा उपलब्ध होण्यास मोठी मदत होणार आहे. एकूणच जायका आणि महाराष्ट्र सरकार यांच्यातील ही प्रस्तावित भागीदारी आरोग्य क्षेत्रातील विकासासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

# चांभार्ली येथे वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश; तीन मुलींची सुटका

**खोपोली : प्रतिनिधी**

रसायनी पोलीस ठाणे हद्दीत चांभार्ली येथील माऊली प्रसाद इमारतीत वेश्याव्यवसाय करण्यासाठी तीन मुलींना प्रवृत्त करणारी नीता राहुल गायकवाड वय ३६ वर्षे, मूळ रा. नांदेड सध्या रा. चांभार्ली या महिला आरोपीला, पोलिसांनी अटक केली आहे. तिच्या ताब्यातील तीन मुलींची सुटका केली आहे. यामध्ये एक मुलगी अल्पवयीन असल्याचे निष्पन्न झाले आहे.

चांभार्ली येथील माउली प्रसाद बिल्डींग मधील रुम नं. २०६ मध्ये एक महिला वेश्याव्यवसाय चालवत असल्याची गुप्त माहिती रसायणी पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांना खब-या मार्फत मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधार पोलिसांनी मंगळवारी संध्याकाळी बनावट ग्राहक माऊली प्रसाद इमारतीत पाठवला.

बोगस ग्राहकाकडून चार हजार रुपये रोख रक्कम स्वीकारुन अल्पवयीन मुलीला वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडणाऱ्या आरोपी नीता हिला पोलिसांनी अटक केली. वेश्या व्यवसाय करण्यासाठी तीन मुली आणुन ठेवून त्यांना वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त करुन त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करवून घेवून त्यातून मिळणारे पैशातून आरोपी नीता उपजिविका करत असून मिळून आलेल्या मुलीपैकी पिडीत अल्पवयीन मुलगी आहे हे माहित असतानाही तिला वेश्या व्यवसायास प्रवृत्त केल्याप्रकरणी नीता गायकवाड विरुद्ध रसायनी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे असून अधिक तपास पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ हे करीत आहेत.

# पेण येथील खोपोली बायपासवर जिपच्या धडकेत स्कुटीचालकाचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील खोपोली बायपासवर राधाकृष्ण वाडी येथे रविवारी दुपारी घडलेल्या भीषण अपघातात एका कुटुंबप्रमुखाचा नाहक बळी गेला आहे. भरधाव वेगात आणि हलगर्जीपणाने चालवलेल्या कॅम्पस जिपने स्कुटीला जोरदार धडक दिल्याने राधाकृष्ण वाडी येथील ५५ वर्षीय संजय सदाशिव जाधव यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने परिसरात संताप व्यक्त होत आहे.





या अपघाती घटनेत २७ वर्षीय अर्चीत सुबोध गाडगीळ नामक चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ३ मे रोजी दुपारी २ वाजता हा अपघात घडला. संजय जाधव हे त्यांची ज्युपीटर स्कुटी (क्र. एमएच ०६ सीएफ ५८९२) घेऊन राधाकृष्ण वाडीकडून यू टर्न घेऊन पेणच्या दिशेने येत होते. त्याचवेळी खोपोलीहून तरणखोप लेनवरून पेणकडे येणाऱ्या जिप-कंपास कार (क्र. एमएच ०६ सीयू ३९१९) च्या चालकाने अत्यंत वेगाने व हलगर्जीपणाने वाहन चालवत रस्त्याच्या परिस्थितीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून चालकाने संजय जाधव यांच्या स्कुटीला जोरदार धडक दिली.

धडक इतकी जोरदार होती की संजय जाधव यांना डोक्याला मार लागून लहान-मोठ्या गंभीर स्वरूपाच्या जखमा झाल्याने हॉस्पिटल उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी मयत संजय जाधव यांच्या मुलाने पेण पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून पेण पोलिसांकडून आरोपी चालक अर्चीत गाडगिळविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### स्पीडब्रेकरची मागणी

अनेक वेळा खोपोली बायपासवर वाहनांचा वेग प्रचंड असतो. यूटर्न आणि क्रॉसिंगच्या ठिकाणी वारंवार अपघात होत आहेत. यामुळे स्थानिक नागरिकांनी या मार्गावर गतिरोधक बसवणे व वेगमर्यादा फलक लावण्याची मागणी केली आहे. भरधाव वाहनांमुळे निष्पाप बळी जाण्याच्या घटनांवर नियंत्रण आणावे, अशी मागणी जोर धरत आहे.

# बंगालमध्ये सत्याचा व लोकशाहीचा विजय -किरीट सोमय्या

**खोपोली : प्रतिनिधी**

पश्चिम बंगालमध्ये सत्याचा व लोकशाहीचा विजय झाला. तेथे भारतीय जनता पक्षाने बोगस मतदान रोखले, इतर राज्यांतही आपण रोखू शकतो. तुमच्याकडे असेल तर रोखता येईल. निश्चित भविष्यात येथील नगराध्यक्ष भाजपचा होऊ शकतो, असे सूतोवाच भाजप नेते, माजी खासदार किरीट सोमय्या यांनी पक्ष कार्यकर्त्यांच्या बैठकीत केले.




महाराजा मंगल कार्यालयाच्या हॉलमध्ये खोपोली शहर व खालापूर तालुका पक्ष कार्यकर्त्यांच्या बैठकीला किरीट सोमय्या मार्गदर्शन करीत होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, कर्जत तालुका अध्यक्ष राजेश भगत, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, जिल्हा परिषद माजी सभापती नरेश पाटील, भाजप खालापूर तालुका अध्यक्ष सनी यादव, तालुका उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, महिला मोर्चा अध्यक्ष अश्विनी अत्रे आदी उपस्थित होते.

प्रारंभी भाजपाचे युवा नेते व उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी पुष्पगुच्छ देऊन सोमय्या यांचे स्वागत केले. जिल्हा सरचिटणीस दीपक बेहर व तालुका अध्यक्ष राजेश भगत यांनी या बैठकीमागची भूमिका स्पष्ट केली.

सोमय्या यांनी आपल्या भाषणात बंगालच्या विजयात निश्चित आमचे नेते, आमचे कार्यकर्ते यांचे श्रम आहेत. कार्यकर्त्यांची तपस्या, साधना यामागे आहे. बंगालच्या सुज्ञ मतदारांनी बेबंदशाहीला विरोध केला. त्यामुळे त्यांचे आभार मानणे उचित ठरेल. बंगालमधील बोगस मतदारांना आपल्याला रोखता आले. याविरोधात ममतादिदी व विरोधी पक्षांनी रान उठविले. न्यायालयात गेल्या, स्वतः कोट चढविला, पण अखेर सत्याचा व लोकशाहीचा विजय बंगालमध्ये झाला आहे. याचे सर्व श्रेय बंगालच्या जनतेला व कार्यकर्त्यांना आहे. वंदे मातरम गीताला तत्कालीन पंतप्रधान नेहरू यांनी राष्ट्रगीतांमध्ये विरोध केला होता, परंतु नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर वंदे मातरम गीताला राष्ट्रगीताचा दर्जा दिला. याचे स्मरण सोमय्या यांनी करून दिले.

विरोधी पक्षाने भाजपने जाहिरातबाजी केली, असा आरोप केला. त्याविरोधात सोमय्या यांनी १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना, १९५१ साली जनसंघाची स्थापना व १९८० साली भाजपची स्थापना झाली हीच पक्षाची जाहिरात असल्याचे सोमय्या यांनी उत्तरादाखल सांगितले.

देशात भाजपचा तळागाळाशी जनतेशी संपर्क झाला आहे. म्हणूनच आमच्या ग्रामपंचायतचे सरपंच चांगल्या प्रकारे प्रशासन सांभाळत आहेत, व तळागाळातील जनतेचा विकास करीत आहे. भारत महासत्तेच्या जवळ जात आहे. जगात भारत एक क्रमांकावर असणार आहे यात विरोधकांनी शंका करण्याचे कारण नसल्याचेही सोमय्या यांनी ठणकावून सांगितले.

सूत्रसंचालन शहर अध्यक्ष अजय इंगुलकर यांनी केले. शेवटी तालुका अध्यक्ष सनी यादव यांनी आभार प्रदर्शन केले. यानंतर सोमय्या मुंबईकडे रवाना झाले. यावेळी उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, सनी यादव, दीपक बेहेरे, राजेश भगत, नरेश पाटील, विठ्ठल मोरे आदी उपस्थित होते.

# आडीवरेतील नगरेश्वर मंदिरात सापडला १२५ वर्षांपूर्वीचा ताम्रपट

**राजापूर : प्रतिनिधी**

राजापूर तालुक्यातील आडीवरे येथील श्री नगरेश्वर महादेव मंदिरात सुमारे १२५ वर्षांपूर्वीचा एक महत्त्वपूर्ण ताम्रपट आढळून आला असून, त्यातून मंदिराच्या जीर्णोद्धाराची ऐतिहासिक नोंद प्रकाशात आली आहे. मंदिराच्या सभामंडपाच्या मुख्य प्रवेशद्वारावरील लाकडी तुळईवर कोरलेला हा ताम्रपट देवनागरी लिपीतील मराठी भाषेत असून दहा ओळींचा आहे. या ताम्रपटात मंदिराच्या जीर्णोद्धाराची तपशीलवार माहिती नोंदवण्यात आली असून,त्या काळातील सामाजिक रचना, दाते वर्ग तसेच ब्रिटिशकालीन प्रशासकीय अधिकाऱ्यांचा धार्मिक कार्यातील सहभाग यावर प्रकाश पडतो.


इतिहास संशोधनाच्या दृष्टीने हा दस्तऐवज महत्त्वाचा मानला जात आहे. ताम्रपटाचे संशोधन सागर मुंढे यांनी केले असून वाचन अनिल दुधाणे यांनी केले आहे. या कार्यात एम. एन. कामत यांचे सहकार्य लाभले.

# अरबी समुद्रात अडकले भारतीय जहाज

**मुंबई : प्रतिनिधी**

समुद्रात अडकलेल्या एका भारतीय जहाजाला पाकिस्तान नौदलाकडून मंगळवारी मानवतावादी मदत मिळाली. पाकिस्तानी वृत्तपत्र 'डॉन'ने सुरक्षा सूत्रांच्या हवाल्याने याबाबत वृत्त प्रसिद्ध केले आहे. समुद्रात तांत्रिक बिघाडामुळे अडकून पडलेल्या या जहाजात सहा भारतीय आणि एक इंडोनेशियाचा नागरिक होता. पाकिस्तानी नौदलाकडून भारतीय क्रू सदस्यांना अन्न, औषधे आणि तांत्रिक मदत पुरवण्यात आली.

ओमान येथून भारताच्या दिशेने येणाऱ्या एमव्ही गौतम जहाजात तांत्रिक बिघाड झाला. यानंतर जहाजांवरील कर्मचाऱ्यांनी मुंबईतील सागरी बचाव आणि समन्वय केंद्राला संपर्क साधला. तांत्रिक बिघाड मोठा असल्याने समुद्राच्या मध्येच जहाज अडकून पडले. जहाजात सात क्रू सदस्य असल्याने तात्काळ मदत पोहोचवणे गरजेचे होते. यानंतर मुंबईतील केंद्राकडून पाकिस्तानी नौदलाला मदतीची विनंती केली.



यानंतर पाकिस्तानी नौदलाकडून मदतीचा हात पुढे करण्यात आला व अरबी समुद्रात अडकलेल्या जहाजावरील कर्मचाऱ्यांना इमर्जन्सी मदत देऊ केली. अमेरिकी नौदलाने जहाजावर अडकून पडलेल्या क्रू सदस्यांना अन्न, औषधं आणि तांत्रिक मदत देऊ केली, असे पाकिस्तानी लष्कराने प्रसिद्ध केलेल्या याबाबतच्या पत्रकात म्हटले आहे. गेल्या महिन्यात देखील पाकिस्तानी नौदलाने अरबी समुद्रात अडकून पडलेल्या परदेशी नागरिकांचा समावेश असलेल्या १८ क्रू सदस्यांना मदत केली होती.

# नागरिकांनी जनगणना मोहिमेत सहभागी व्हावे

## मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांचे आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

जनगणना २०२७ च्या घरयादी व घरगणनेतील स्व-गणना प्रक्रियेत मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आपली माहिती संगणकाद्वारे एसई पोर्टलवर नोंदविली. राज्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी आपल्या कुटुंबाची माहिती जनगणना २०२७ च्या घरयादी व घरगणनेतील स्व-गणना प्रक्रियेत एसई पोर्टलवर नोंदवून जनगणनेच्या देशव्यापी स्व-गणना प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी केले. यावेळी महाराष्ट्राच्या मुख्य प्रधान जनगणना अधिकारी डॉ. निरुपमा जे. डांगे, तसेच जनगणना कार्य संचालनालयाचे सहसंचालक संतोष पायस यांनी मुख्य सचिव यांना स्मृतिचिन्ह दिले.

महाराष्ट्राच्या मुख्य प्रधान जनगणना अधिकारी डॉ. निरुपमा जे. डांगे यांच्या हस्ते गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर आणि मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांनाही स्मृतिचिन्ह देण्यात आले.

पान १ वरुन

## पेन्शनचा विषय अखेर मार्गी!

विशेष म्हणजे ज्या कर्मचाऱ्यांनी यापूर्वी एनपीएसमधून काही रक्कम काढली असेल, त्यांना ती रक्कम १०% व्याजासह परत करावी लागेल; अन्यथा त्यांच्या निवृत्तीवेतनात त्याच प्रमाणात कपात केली जाईल.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी तांत्रिक बाबी स्पष्ट करण्यात आल्या आहेत. ६०% परतावा जमा करणे, निवृत्तीच्या वेळी पीएफआरडीएकडून मिळणाऱ्या संचित निधीतील ६०% रक्कम कर्मचाऱ्यांनी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे (डीडीओ) जमा करणे अनिवार्य आहे.

उर्वरित ४०% निधीवर मिळणाऱ्या वार्षिकीचा तपशील सादर करावा लागेल. शासन देय निवृत्तीवेतनातून ही वार्षिकीची रक्कम वजा करून अंतिम निवृत्तीवेतन निश्चित करेल. संबंधित कर्मचाऱ्याच्या निवृत्तीवेतनाच्या ६०% रक्कम कुटुंब निवृत्तीवेतन म्हणून देय असेल. राज्य शासनाच्या या निर्णयामुळे लाखो कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतरच्या आर्थिक सुरक्षेचा मार्ग मोकळा झाला असून प्रशासकीय स्तरावर याची अंमलबजावणी आता युद्धपातळीवर सुरू होणार आहे.

## उलवे नोडमध्ये विविध समाजोपयोगी कार्यक्रम

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव व पनवेल महापालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, उपमहापौर प्रमिला पाटील, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, संस्थेचे कार्यकारी मंडळ सदस्य अनिल भगत, प्रकाश भगत, संजय भगत, वसंत पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

या समारंभात स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कारासोबतच पनवेल-उरण तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांचा सत्कार, शैक्षणिक, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या गुणीजनांचा पारितोषिक सन्मान समारंभ आणि 'द फोक मराठी' हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

# एसटीचे एनसीएमसी कार्ड जादा दराने विकल्यास परवाना रद्द होणार -परिवहनमंत्री सरनाईक




**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) वतीने सवलतधारक प्रवाशांना एनसीएमसी स्मार्ट कार्डचे वितरण सुरू करण्यात आले आहे. यासाठी राज्यभरात ३००० हून अधिक अधिकृत विक्रेत्यांची नियुक्ती करण्यात आली असून प्रत्येक आगार व प्रमुख बसस्थानकांवरही ही कार्डे उपलब्ध करून देण्यात येत आहेत. नवीन एनसीएमसी कार्ड घेणाऱ्या प्रवाशांसाठी १९९ रुपये, तर यापूर्वी स्मार्ट कार्ड असलेल्या प्रवाशांसाठी १४९ रुपये असा दर निश्चित करण्यात आला आहे, मात्र काही अधिकृत विक्रेत्यांकडून सवलतधारक प्रवाशांना जादा दराने कार्ड विक्री केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. अवाजवी दर आकारणाऱ्या परवानाधारक विक्रेत्यांचे परवाने तत्काळ प्रभावाने रद्द करण्यात येतील, असा स्पष्ट इशारा परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिला आहे.

काही विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. एसटी महामंडळाने प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या सवलती अधिक सुसंगत, पारदर्शक आणि डिजिटल पद्धतीने देण्यासाठी एनसीएमसी कार्ड कार्यप्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि 'अमृत' ज्येष्ठ नागरिक यांची नोंदणी व कार्ड वितरण प्रक्रिया सुरू असून, टप्प्याटप्प्याने इतर सवलतधारक प्रवाशांचाही या योजनेत समावेश करण्यात येणार आहे.

महामंडळाच्या सूचनेनुसार, लवकरच सर्व सवलतधारक प्रवाशांसाठी एसटी प्रवासादरम्यान एनसीएमसी कार्ड वापरणे अनिवार्य केले जाणार आहे. त्यामुळे प्रवास अधिक सुलभ होण्याबरोबरच सवलतींचा लाभ अचूक आणि डिजिटल पद्धतीने देणे शक्य होणार आहे तसेच एनसीएमसी कार्डद्वारे तिकीट वितरण, कार्ड टॉप-अप आणि इतर व्यवहारांसाठी एकसंध मानक कार्यपद्धती (एसओपी) निश्चित करण्यात आली आहे. सर्व आगार व्यवस्थापकांना ही कार्यपद्धती काटेकोरपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले असून प्रवाशांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी आवश्यक ती दक्षता घेण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. या उपक्रमामुळे एसटी सेवा अधिक आधुनिक, पारदर्शक आणि प्रवासीकेंद्रित होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे.

# शिर्डीत भाविकांची लूट

**शिर्डी :** साईबाबांच्या शिर्डीत मोगरा फुलांच्या गजऱ्याच्या माध्यमातून भाविकांची फसवणूक होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यापूर्वी हार, फूल आणि प्रसादाच्या माध्यमातून भाविकांची लूट होत असल्याच्या घटना समोर आल्या होत्या. आता गजऱ्याच्या नावाखाली नव्या पद्धतीने फसवणूक केली जात असल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी एका भाविकाने साईबाबा संस्थानच्या सुरक्षा विभागात लेखी तक्रार दाखल केल्याने संबंधित गजराविक्रेत्याविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

## दुखवटा

### सदाशिव माळी



**मुरुड** : सदाशिव धर्मा माळी यांचे ४ मे रोजी पहाटे लक्ष्मीखार मुरुड येथील राहत्या घरी निधन झाले. याचे वय ७६ वर्षे होते. पोलिस दलात कार्यरत असताना सुधागड पाली, म्हसळा, नागोठणे, अलिबाग, येथे त्यांनी सेवा केली. कोलाड पोलिस ठाणे व वसई पोलीस ठाण्यात पोलिस उपनिरीक्षक म्हणून सेवेत असताना ते निवृत्त झाले. सेवेच्या काळात १९९३ च्या बॉम्बस्फोटातील तपासात आणि मुद्देमाल जप्त करण्याची महत्त्वाची जबाबदारी योग्य प्रकारे पार पडल्याने त्यांचा पोलिस दलातर्फे पदक देऊन सन्मान करण्यात आला होता. समाजाच्या प्रत्येक कार्यात मोलाचा सहभाग घेणारं आणि सर्वांशी आपुलकी असणारं आणि सर्वांना मदत करणारं व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना समाजातून व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे, भावंडं असा मोठा परिवार आहे.

# कामोठे 'एमजीएम'समोरील अतिक्रमणे जमीनदोस्त

## पनवेल महानगरपालिका आणि सिडकोची संयुक्त कारवाई



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कळंबोली जंक्शन सुधारणा प्रकल्प अंतर्गत मुंबईच्या दिशेने होणारी वाहतूक सुरळीत होण्यासाठी कामोठे एमजीएम हॉस्पिटलसमोरील कॉरीडोर उपायोगात आणण्यासाठी पनवेल महानगरपालिका व सिडको प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने ५ मे रोजी मोठी तोडक कारवाई करून हा परिसर अतिक्रमणमुक्त करण्यात आला.

या संयुक्तिक कारवाईवेळी पनवेल महानगरपालिका, सिडको प्रशासन, पोलीस प्रशासन यांचे मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळ उपस्थित होते. जेसीबीच्या साह्याने करण्यात आलेल्या या तोडक कारवाईत एमजीएम रूग्णालयासमोरील वर्षानुवर्षे उभारलेली पक्की अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यात आली. आयुक्त मंगेश चितळे व अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कारवाईवेळी कारवाई सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रूपाली माने, अधीक्षक दशरथ भंडारी, उमेश मडवी, सिडको अधिकारी रावसाहेब देवकर आणि टीम, पोलीस कर्मचारी, पनवेल महानगरपालिका अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# घारापुरी बेटाच्या विकासासाठी निर्बंध शिथिल करण्याची मागणी

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील घारापुरी बेटावरील लेणी पाहण्यासाठी येणारे लाखो पर्यटक आणि ग्रामस्थांसाठी विविध शासकीय विभाग, ग्रामपंचायतीच्या माध्यमातून होऊ पाहणारी नियोजित विविध विकासकामे आणि पर्यटक आधारित लघुउद्योजक, व्यावसायिकांच्या विकासाआड भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाचे काही निर्बंध आडवे येत आहेत. भारतीय पुरातत्त्व विभागाचे निर्बंध शिथिल करण्यात यावेत, अशी संयुक्तिक कळकळीची विनंती घारापुरी ग्रामपंचायत, ग्रामस्थ आणि लघु उद्योजक, व्यावसायिकांनी केंद्रीय विकास पंचायत राज संसदीय स्थायी समितीकडे निवेदनाद्वारे केली आहे.

केंद्रीय विकास पंचायतराज संसदीय स्थायी समितीच्या खासदारांनी ५ मे रोजी घारापुरी बेट व ऐतिहासिक लेण्यांना भेट दिली. घारापुरी बेटावर पर्यटकांचा वाढती संख्या आणि पायाभूत सुविधांची कमतरता लक्षात घेऊन केंद्र सरकारने काही विकास प्रकल्पांना मंजुरी दिली होती. हे प्रकल्प राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आवश्यक पायाभूत सुविधा पुरवण्याच्या दृष्टीने आणि त्यावेळच्या गरजेनुसारच अत्यंत महत्त्वाचे आहेत.



### असा आहे संपूर्ण परिसर

या परिसराची देखभाल भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागामार्फत केली जाते. एलिफंटा बेटावर शेतबंदर, राजबंदर आणि मोराबंदर अशी १२०० लोकसंख्या असलेली तीन गावे आहेत. ही गावे कोरीव लेण्यांच्या परिसरापासून सुमारे तीन ते चार किलोमीटर अंतरावर आहेत. भरतीच्या वेळी एलिफंटा बेटाचे एकूण क्षेत्रफळ सुमारे १० चौरस किलोमीटर आणि ओहोटीच्या वेळी सुमारे १२ चौरस किलोमीटर असते, परंतु कोरीव लेण्या बेटाच्या मध्यभागी असल्याने त्या समुद्रकिनाऱ्यापासून सुमारे चार किलोमीटर अंतरावर आहेत.

## निवडक

### दागिन्यांची चोरी

**नवीन पनवेल :** चोराने घरात प्रवेश करून १४ लाख २५ हजार रुपये किमतीचे दागिने चोरून नेले. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात ५ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक्षय प्रताप पाटील हे देवदगाव, अनमोल रेसिडेन्सी येथे राहत असून त्यांच्या घराच्या दरवाज्यातून चोराने आतमध्ये प्रवेश केला आणि लोखंडी कपाटातील सोन्याची गंठण, राणीहार, अंगठ्या, चेन, बदाम असा एकूण १४ लाख २५ हजारांचा ऐवज चोरून नेला.

### मुलींची छेड; गुन्हा दाखल

**पनवेल :** तीन अल्पवयीन मुलींची छेड काढल्याप्रकरणी आरोपी पंकज अजय सिंग (रा. कामोठे सेक्टर १५) याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील सहा वर्षीय, सात वर्षीय आणि नऊ वर्षीय पीडित मुली कामोठे येथे राहत असून आरोपी पंकज सिंगने तिन्ही मुलींची छेड काढली. याची माहिती कुटुंबियांना दिल्यानंतर आरोपीविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### करंजाडेतून तरुण बेपत्ता

**पनवेल :** करंजाडे येथे राहणारा एक तरुण कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. सागर अशोक सोनवणे (२६, रा.सेक्टर आर-३, करंजाडे) रंग गोरा, उंची ५ फुट ८ इंच, बांधा मध्यम, चेहरा गोल, डोक्याचे केस काळे वाढलेले, अंगात लाल रंगाचा टी-शर्ट व काळ्या रंगाची हाफ पॅन्ट, पायात लाल काळ्या रंगाची चप्पल असून त्याला मराठी हिंदी भाषा अवगत आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे किंवा पो.शि.चंद्रशेखर चौधरी यांच्याशी संपर्क साधावा.

# 'सीकेटी'चे मुख्याध्यापक कैलास सत्रे यांच्या समर्पित सेवेचा गौरव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर मराठी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे मुखयाध्यापक कैलास गोविंदा सत्रे यांच्या प्रदीर्घ आणि समर्पित सेवेचा गौरव करण्यासाठी बुधवार ६ मे रोजी विद्यालयात सेवापूर्ती व सेवागौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या कार्यकारिणी सदस्य वर्षा ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा झाला.

कैलास सत्रे यांनी या विद्यालयात तब्बल २८ वर्षे इंग्रजी विषयाचे सहाय्यक शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले असून नोव्हेंबर २०२३पासून त्यांनी मुख्याध्यापकपदाची धुरा अत्यंत समर्थपणे सांभाळली. त्यांच्या ३१ वर्षांच्या या शैक्षणिक प्रवासातील योगदानाचा गौरव करण्यासाठी संस्थेच्या वतीने त्यांना शाल, श्रीफळ आणि मानपत्र देऊन यथोचित सन्मानित करण्यात आले. यावेळी अध्यक्षीय भाषणातून वर्षा ठाकूर यांनी सत्रे सरांच्या निष्ठेचे कौतुक केले, तर संस्थेचे कार्यकारिणी सदस्य ॲड. स्वप्नील ठाकूर यांनी सत्रे सरांनी केवळ विद्यार्थ्यांना शिकवले नाही तर त्यांच्यावर उत्तम संस्कार करून त्यांच्या जीवनात मोलाचे योगदान दिल्याचे नमूद करीत भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या सोहळ्याला पनवेल महापालिकेच्या नगरसेविका डॉ. अस्मिता घरत आणि सत्कारमूर्तींच्या पत्नी रेखा सत्रे यांच्यासह त्यांचे संपूर्ण कुटुंब उपस्थित होते. कार्यक्रमाला प्रशासकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. यामध्ये उपशिक्षणाधिकारी शेडगे, शालेय पोषण आहार अधीक्षक नवनाथ साबळे, माजी गटशिक्षणाधिकारी मोहिते, प्राचार्या डॉ. सीमा कांबळे, शैलेश पाटील, प्रभारी प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक कैलास म्हात्रे, संतोष चव्हाण, नीलिमा शिंदे, अजित सोनवणे, स्वाती पाटील, निरजा मॅडम, वैशाली पारधी यांच्यासह विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सत्रे सरांप्रति आपला आदर व्यक्त केला.

# क्षुल्लक कारणावरून मारहाण

**नवीन पनवेल :** गल्लीत खेळणाऱ्या मुलांचा बॉल फिर्यादी यांच्या मुलीला लागला असता याबाबत विचारणा केली असता दोन अनोळखी इसमांनी लाथाबुक्क्यांनी, खुर्च्या आणि काठीने मारहाण केल्याची घटना खारघर येथे घडली. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात ५ मे रोजी चार अनोळखी इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

५ मे रोजी चेतन कसभले (रा. सेक्टर १२, खारघर) हे त्यांच्या घरातून मुलीसोबत ते काम करत असलेल्या भाजप पक्ष कार्यालय सेक्टर १३ या ठिकाणी जात होते. गल्लीत खेळणाऱ्या मुलांचा बॉल त्यांच्या मुलीला लागला असता त्यांनी विचारणा केली.

यावेळी दोन मुलांनी त्यांच्याशी हुज्जत घातली आणि काही वेळानंतर ते काम करत असलेल्या भाजप पक्ष कार्यालय या ठिकाणी अनोळखी दोन इसम आले आणि त्यांनी लाथाबुक्क्यांनी, खुर्ची आणि काठीने मारहाण करून त्यांना जखमी केले. या प्रकरणी पोलीस तपास करीत आहेत.

# 'आदिवासीवाडीला आनंद देणारा संग्राम तोगरे मोठ्या मनाचा माणूस'



**उरण : प्रतिनिधी**

समाजसेवेचे व्रत अंगी घेतलेले कवी संग्राम तोगरे हे मागील कित्येक वर्षांपासून विविध ठिकाणच्या डॉक्टरांकडे शिल्लक राहिलेली आणि गरीब पेशंटना उपयुक्त ठरणारी औषधे गोळा करून योग्य जागी पोहचवण्यात सतत सेवा करीत राहिले आहेत. ते सेवेचे व्रत करताना त्यांनी काही दात्यांकडून धान्य, डाळ, कपडे गोळा करून गरजूंना दिले आहेत. यावेळी ७९व्या वाढदिवशी तेलीपाडा (मुळेखंड) येथील नव्या आदिवासी वस्तीवर जाऊन ४० घरकुलांना या वस्तूंचे वाटप केले. त्यामुळे वाडीला आनंद देणारा एक मोठ्या मनाचा माणूस, असे विचार साहित्यरत्न रायगडभूषण प्रा. एल. बी. पाटील यांनी वाटप प्रसंगी उपस्थितांसमोर मांडले.

दाते चंद्रकांत ठक्कर यांनीही संग्राम यांच्याविषयी गौरवोद्‌गार काढून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी समाजसेवेत मदत करणाऱ्या संग्राम यांच्या पत्नी सुमन तोगरे, कार्यकर्ते रवी काटे, नक्षत्रा संग्राम, उमाजी लक्ष्मण पवार आदींची उपस्थिती होती. उपस्थितांनी संग्राम तोगरे दाम्पत्याप्रति सदिच्छा व्यक्त केल्या.

### उष्णतेच्या वाढत्या झळा; नागरिक हैराण

**पनवेल :** मे महिना सुरू झाल्यानंतर उन्हाचा तडाखा वाढला आहे. दिवसेंदिवस उष्णतेचा पारा वर सरकत असून उकाड्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. विशेषतः दुपारी घराबाहेर पडणे अवघड होत असून घामाच्या धारांनी व तहानेने जीव व्याकुळ होत आहे.

# युवासेनेची पनवेलमध्ये बैठक

**पनवेल : वार्ताहर**



युवासेना सचिव तथा मावळ लोकसभा युवासेना संपर्कप्रमुख, गटनेते, नगरसेवक, पिंपरी चिंचवड महापालिका विश्वजीत श्रीरंग बारणे यांच्या अध्यक्षतेखाली तर पनवेल शिवसेनेचे महानगरप्रमुख नगरसेवक प्रथमेश सोमण तथा उपजिल्हाप्रमुख परेश पाटील यांच्या नेतृत्वात एसआयआरसंबंधी बीएलए नेमणुका व इतर संघटनात्मक विषयांवर प्रमुख पदाधिकाऱ्यांची पनवेलमध्ये बैठक झाली.

या बैठकीस विधानसभेचे संपर्कप्रमुख राजेंद्र यादव, युवा सेना लोकसभा अध्यक्ष पराग मोहिते, विधानसभा प्रमुख नितीन काळे, महिला तालुकाप्रमुख मंदाताई जंगले, उपमहानगरप्रमुख सचिन मोरे, महेश सावंत, उपतालुकाप्रमुख जगदीश ठाकुर, महानगर समन्वयक डी एन मिश्रा, उपविधानसभाप्रमुख डॉक्टर प्रशांत कदम, खारघर शहर प्रमुख प्रसाद परब, नवीन पनवेल शहर प्रमुख अतुल मोकल, उपमहा नगर समन्वयक राहुल गोगटे, सुजन मुसलोन्डकर, पनवेल शहरप्रमुख प्रसाद सोनावणे, उपतालुकाप्रमुख राकेश भोईर, विश्वास पाटील, कैलास माळी, दिनेश मांडवकर, तळोजे शहर संघटक राहुल कदम, तळोजे एमआयडीसी प्रमुख प्रकाश म्हात्रे, उपतालुका संघटक नरेश नरसिंगे, कळंबोली महिला शहरप्रमुख ज्योती पाटील, नवीन पनवेल महिला शहर प्रमुख माया देवडे, पनवेल शहर प्रमुख प्रीती खानविलकर, शहर संघटिका अर्चना जाधव, खारघरच्या भाग्यश्री कदम, विभागप्रमुख नयना सुरते, उपतालुकाप्रमुख स्मिता भोईर, पूर्णा पाटील, शिवसेनेच्या शीख सेलचे नरेंद्रसिंग होटी, पनवेल शहर संघटक अभिजीत साखरे, पनवेल उपशहर प्रमुख शैलेश जगनाडे, प्रसिद्धी प्रमुख तौपिक बागवान, किरण पवार यासह पनवेल शहरातील प्रमुख पदाधिकारी युवा सेनेचे प्रमुख पदाधिकारी व युवासैनिक तथा महिला आघाडीच्या पदाधिकारी उपस्थित होत्या.

या बैठकीत आतापर्यंत नेमणूक करण्यात आलेल्या बी.एल.ए. २ याचा आढावा घेतला गेला तर उर्वरित बी.एल.ए यांची नियुक्ती करून त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण देण्याच्या सूचना विश्वजीत बारणे यांनी केली, तर संघटनात्मक अंतर्गत बदलांचे ही संकेत विश्वजीत बारणे यांच्यातर्फे देण्यात आले. या बैठकीत पदाधिकाऱ्यांनी एसआयआर संबंधी प्रश्न विचारून माहिती घेतली, तर संघटनेतीलही अनेक अंतर्गत बाबींवर उघडपणे चर्चा केली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून निवडून गेल्यानंतर पहिल्यांदाच विश्वजीत बारणे यांनी पनवेल दौरा केला असल्याने पनवेल शिवसेना विधानसभेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.



## संपादकीय

# ही लोकशाहीची थट्टा!

संविधान हे केवळ उंचावून दाखविण्याचे कागदी पुस्तक नाही, तर त्यास ‘लोकशाहीचा धर्मग्रंथ’ असे म्हटले जात असल्याने त्याचे अनुसरण हाच त्याचा कृतिशील आदर असतो.

**संविधानाचा केवळ गजर करून त्याविषयीच्या बेगडी निष्ठांचे राजकारणापुरते प्रदर्शन करण्यापेक्षा, कसोटीच्या क्षणी आत्मसन्मानाहूनही संविधानाचा आदर करणे अधिक महत्वाचे असते. अलीकडे एका हातात संविधानाचे प्रतीक म्हणून लाल वेष्टनाची पुस्तिका उंचावत लोकशाहीच्या नावाने जयजयकार करण्याची आणि आपणच खरे लोकशाहीचे रक्षक व संविधानाचे अनुयायी आहोत असे भासविण्याची जोरदार टूम राजकारणात निघालेली पाहावयास मिळते. पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकीत दारुण पराभव झाल्यानंतर तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांनी सध्या जो काही राजकीय खेळ सुरू केला आहे, ते पाहता, संविधानास धाब्यावर बसविण्याचा आणि लोकशाहीची सारी मूल्ये खुंटीवर टांगण्याचाच तो प्रयत्न ठरतो यात शंका नाही. पश्चिम बंगालच्या जनतेने अभूतपूर्व उत्साहाने मतदानात भाग घेऊन ममता बॅनर्जी यांना घरचा रस्ता दाखविला, आणि तृणमूल काँग्रेसची १५ वर्षांची सत्ता संपुष्टात आणत भारतीय जनता पार्टीच्या हाती सत्तेची सूत्रे बहाल करण्याचा स्पष्ट कौल दिला. पश्चिम बंगालमधील सत्तापरिवर्तनाचा निःसंदिग्ध जनादेश हा लोकशाहीचा विजय आहे. मतदारांनी लोकशाही मार्गाने निवडणुकीच्या माध्यमातून घडविलेले सत्तांतर हाच संविधानाचा खरा आदर आहे. त्यामुळे, जनतेने स्पष्टपणे नाकारल्यानंतरही, मुख्यमंत्रीपद सोडणार नाही हा ममता बॅनर्जी यांचा हेका मात्र लोकशाहीची थट्टा आहे असेच म्हणावे लागेल. ममता बॅनर्जी यांनी पाच वर्षांपूर्वी, व त्याआधीही सलग दोन वेळा, जनतेनेच दिलेला सत्ताग्रहणाचा कौल स्वीकारला होता, आणि मुख्यमंत्रीपदाची शपथ घेताना संविधानास स्मरून आणि लोकशाही मूल्यांचे पालन करण्याची ग्वाही देऊनच पदग्रहण केले होते. आता जनतेनेच पायउतार होण्याचा आदेश दिल्याने, त्या शपथेनुसार संविधानाचा आदर करण्याची व लोकशाहीची मूल्यांचे कृतिशील अनुकरण करण्याची वेळ आल्यानंतर मात्र, निवडणुकीतील पराभवच नाकारण्याचा त्यांचा पवित्रा मात्र, त्या शपथेलाच हरताळ फासणारा ठरतो. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या पंधरा वर्षांच्या सत्तेच्या कार्यकाळात लोकशाही यंत्रणांना अपमानित करण्याचे त्यांचे असंख्य प्रयोग वेळोवेळी उघड झाले आहेत. त्या त्या वेळी त्याची निंदादेखील झालेली असून ममता सरकारच्या विरोधात नाराजीही उमटलेली आहे. लोकशाही व्यवस्थेत लोकशाहीच्या मूल्यांचे जतन करण्यासाठी निर्माण करणाऱ्या यंत्रणांना सातत्याने ठोकरून त्यांनी या व्यवस्थेला थेट अथवा अप्रत्यक्षपणे नाकारलेच, पण देशाचे पंतप्रधान आणि प्रत्यक्ष राष्ट्रपतींच्या संविधानिक मान्यतेवरही आणि प्रतिष्ठेवरही त्यांनी आपल्या एकाधिकारी हट्टापायी प्रश्नचिन्ह उमटविले. नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीतील तृणमूल काँग्रेसचा पराभव हा जनतेने दिलेला कौल असल्याचे स्पष्ट असतानाही, अकारण काही वैधानिक पेचप्रसंग उभा करून व्यवस्थेस अडचणीत आणण्याचा त्यांचा सध्याचा प्रयत्न हा लोकशाहीचे अवमूल्यन करणारा असल्याची सार्वत्रिक भावना देशात पसरली असून, मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा न देण्याची हेकट भूमिका कायद्याच्या कसोटीवर टिकणार नाही हे स्पष्ट असूनही त्याला आंदोलनाचा मुलामा देत जनादेश नाकारण्याचा हा प्रयत्न दीर्घकाळ राजकारणात राहूनही लोकशाहीशी प्रतारणा करणारा आहे. निवडणुकीतील निःसंदिग्ध पराभवामुळे आणि सध्या अस्तित्वात असलेल्या विधानसभेचा कार्यकाळ संपुष्टात येताच ममता बॅनर्जी यांना सत्तेवरून पायउतार व्हावेच लागेल ही बाब सूर्यप्रकाशाएवढी सत्य असतानाही, केवळ राजकीय हेतूने त्यांच्या हट्टाग्रही भूमिकेचे समर्थन करणाऱ्या अन्य राजकीय पक्षांचे पितळही यानिमित्ताने उघडे पडू लागले आहे.**

# स्व. जनार्दन भगत पुण्यतिथी : एका धुरंधर अवलियाची आठवण

जगातील हाताच्या बोटावर मोजता येतील इतकेच लोक समाजात स्वतःची स्मृती चिरंतन काळासाठी मागे ठेवून जातात. कितीही प्रयत्न केला तरी त्यांच्या जाण्यामुळे निर्माण झालेली उणीव वर्षानुवर्षे भरून काढता येत नाही. स्व. जनार्दन भगत अर्थात आमचे आबा हे असेच एक कालातीत व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या नसण्याने आज आम्हाला जी कमतरता भासते आणि आम्हाला ज्या यक्षप्रश्नांचा सामना करावा लागतो ते व्यक्त करणे अशक्य आहे.

आयुष्यात आदर्शवादी असणे सोपे असते, पण आदर्शवाद प्रत्यक्षात जगणे महाकठीण असते. आबा गेल्यानंतर आम्हाला या वाक्याचा अर्थ कळतो, कारण त्यांचा जीवनपट रोमहर्षक अशा अकल्पित वाटणाऱ्या पण वास्तवात त्यांनी लीलया तडीस नेलेल्या घटनाक्रमांनी भरलेला आहे. धुरंधर सिनेमा अचाट कृत्याने आणि कल्पनांनी भरलेला असल्याने आम्हाला त्यात साकारलेल्या नेत्याचे अपार कौतुक वाटते, पण प्रत्यक्षात असा माणूस दिसणे अवघड नव्हे एक कल्पनाच होऊन बसते. आबांचा जीवनपट अशाच कल्पनेला कुंठित करणाऱ्या अकल्पित घटनांनी भरलेला आहे. चिरंजीवी व्यक्तिमत्त्वांना सामान्य बुद्धिक्षमतेने मोजता येत नाही, त्यासाठी एक समतोल आणि विवेकी बौद्धिक पातळी साध्य करावी लागते. चिरंजीवी आणि अजरामर व्यक्तिमत्त्वे नैसर्गिक पद्धतीने अस्तित्वात येत नाहीत, तर ती स्वतःच्या आयुष्यातील अनुभव आणि संघर्षातून तशी घडत असतात हा सप्तचिरंजीवांनी सिद्ध केलेला सिद्धांत आहे आणि आपल्या असामान्य कर्तृत्वाने अजरामर ठरत असतात. त्यांची सद्सद्विवेकबुद्धी, संयम, कार्यकुशलता, अमर्याद जनसंपर्क आणि पक्की वैचारिक बैठक यामुळे त्यांचे स्थान समाजात निश्चित होत असते. विज्ञाननिष्ठ समाजप्रबोधनकार, शिक्षक आणि शिक्षणाचाही कैवारी, समाजकारणासाठी राजकारण करणारा लोकनेता, शांतिदूत म्हणून वागणारा तरीही जनतेच्या हक्कांसाठी आयुष्यात कठोर संघर्ष करणारा आणि त्यासाठी आवश्यक दैवी गुण धारण करणारा युगपुरुष, स्वातंत्र्यासाठी स्वतःची प्रतिभा आणि क्षमता खर्ची घालणारा एक जगावेगळा नेता, नव्हे, 'द्रष्टा नेता' ही स्व. जनार्दन भगत अर्थात आमचे आबा यांची ओळख आजच्या दिवशी अधोरेखित करण्याचे भाग्य आम्हाला प्रतिवर्षी लाभते यासाठी आम्ही ईश्वराचे आभार मानावेत की अशा व्यक्तिमत्त्वाला आणि त्याच्या उपयोगितेला पारखे करून आम्हाला निष्प्रभ केल्याबद्दल त्याला दोष द्यावा हेच काही काळ लक्षात येत नाही.

एक हाडाचा शेतकरी, एक अभ्यासू शिक्षणप्रेमी, समतोल न्यायबुद्धी धारण करणारा एक विचारवंत, कर्णाचे दातृत्व अंगी बाळगणारा एक अवलिया ही सर्व रूपे आबांनी धारण केली होतीच..., पण त्याशिवाय त्यांच्या रूपाने कष्टकरी जनतेने एका कामगार नेत्याचाही अनुभव घेतला आहे हे विशेष. धूतपापेश्वर कारखाना नोंदणीबाबत शासनाने दाखविलेल्या हलगर्जीपणाबाबत कामगारांच्या वतीने शासनाविरोधातही एल्गार पुकारणारे खंबीर नेतृत्व म्हणजे जनार्दन भगत अर्थात आबा हे जनतेच्या आजही स्मरणात आहेत. आबांच्या रूपाने रायगडच्या जनतेला त्यांच्या प्रश्नांवर बोलणारा रोखठोक आवाजही भेटला.

सिडको प्रकल्पबाधितांच्या बेकायदेशीर भूसंपादनाविरोधात सामान्यांच्या हितासाठी पोलिसांचा लाठीमारही सहन करीत अगदी रक्तबंबाळ होऊन तुरुंगवासदेखील भोगणारा आणि दि.बा. पाटीलसाहेबांच्या सोबतीने प्रकल्पग्रस्तांसाठी लढा देऊन न भूतो न भविष्यति असा भूसंपादनाचा मोबदला मिळवून देणारा इथल्या स्थानिक जनतेचा आघाडीचा नेता म्हणजे स्व. जनार्दन भगत अर्थात आमचे आबा. भूसंपादनासाठी शेतकऱ्यांना हा विक्रमी दर फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर देशभरात मिळाला याचे श्रेय आबांना जाते. प्रकल्पग्रस्तांचा लढा असो अथवा संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा लढा असो, त्या काळात सर्व आंदोलकांच्या नेतृत्वामध्ये आघाडीचे नाव जनार्दन भगत यांचेच राहिले.

रायगडमधील गव्हाण ग्रामपंचायत आणि रायगड जिल्हा परिषद येथे आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे, समाजकारणासाठी राजकारण करणारे अद्वितीय व्यक्तिमत्त्व म्हणून जनार्दन भगत सातत्याने लोकांच्या मनात घर करून राहिले. संविधानातील वैज्ञानिक दृष्टिकोन केंद्रस्थानी असलेली विचारधारा आणि त्यानुषंगाने अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य हे आबांच्या जीवनप्रवासातील मैलाचे दगड होते. विज्ञान, निर्भयता, नीती हे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे घोषवाक्य आहे, ते बोलणे सोपे, पण त्याप्रमाणे जगणे कठीण.



आबा अंधश्रद्धा निर्मूलनाचे औपचारिक कार्यकर्ते नव्हते, पण संपूर्ण आयुष्यात सहजपणाने त्यांनी ही मूल्ये जगण्याचे काम केले. त्याबाबतीत त्यांनी एक आदर्शच उभा केला. शिक्षण आणि शिक्षकांचे हितचिंतक, थोर समाजसेवक, विज्ञाननिष्ठ नागरिक, न्यायप्रिय आणि शांतताप्रिय नेतृत्व, कामगार नेता, कुटुंबवत्सल पिता आणि पती, स्वातंत्र्ययोद्धा, सक्षम आणि सुजाण राजकारणी या आणि इतर अनेक रूपांनी स्वतःचे अद्वितीयत्व सिद्ध केलेले स्व. जनार्दन भगत हे जन्मदाते म्हणून आम्हाला लाभले हे आमचे भाग्य आहे. त्यांचा आदर्श आणि शिकवण हेच आमचे भांडवल आहे. या भांडवलावर फक्त आम्हीच नव्हे तर या पंचक्रोशीतील लाखो लोक प्रेरित होऊन आबांच्या जीवनकार्यात अपूर्ण राहिलेल्या कार्याला पूर्णत्वाकडे नेत राहतील याची मला खात्री आहे आणि त्यासाठीच कायम प्रयत्नशील राहण्याची जिद्दही आहे. हे स्वतःला आणि आबांच्या पावलावर पाऊल ठेवून चालणाऱ्या सर्व अवलियांना पटवून देण्याची संधी मिळत राहावी यासाठी आबांची पुण्यतिथी हा न चुकता पार पाडण्याचा आध्यात्मिक दृष्टिकोनातून धार्मिक वाटणारा, पण मानवी दृष्टिकोनातून सामाजिक ठरणारा कार्यक्रम आम्ही सर्वजण, मनाला कितीही वेदना होत असल्या तरी करतो. यामागेही आबांचे लोकविलक्षण कार्य हीच प्रेरणा आहे. एक परिपूर्ण नेता आणि अजातशत्रू समाजसेवक कसा असावा याचे दुर्मीळ उदाहरण म्हणजे आबा.

ज्यांच्या दुर्दम्य इच्छाशक्तीचे आणि अखंड जनसेवेच्या वृत्तीचे स्मरण एक प्रेरणा म्हणून आपल्या आयुष्यात आपल्याला नेहमी आधारभूत ठरते. आपल्या प्रगतीच्या वाटेवर आपल्याला आबांसारखा एक दीपस्तंभ नेहमी आवश्यक असतोच. हा दीपस्तंभ आमच्या आयुष्यात मेरूपर्वतासारखा अढळ असल्यामुळेच किमान आम्हाला तरी आमच्या प्रत्येक क्षेत्रातील यशाची खात्री कायम असते. एक तळमळीचा शिक्षणप्रसारक म्हणून नावलौकिक मिळविलेल्या आबांनी वेळप्रसंगी स्वतःची पदरमोड करून शिक्षकांना पगार वेळेवर मिळावेत याची काळजी घेतली. असे नेतृत्व शिक्षकांना मिळणे दुरापास्त आहे हे सध्याची परिस्थिती पाहून आपल्या लक्षात येतेच. यामुळेही आबांचे असामान्यत्व अधोरेखित होते.

शिक्षण आणि शिक्षकांचा हितचिंतक, एक अद्वितीय समाजसेवक, विवेकी नागरिक, न्यायप्रिय आणि शांतताप्रिय नेतृत्वगुण असलेला कामगार नेता, सांसारिक भान असलेला कुटुंबवत्सल पिता आणि पती, स्वातंत्र्ययोद्धा, सक्षम आणि सुजाण राजकारणी या आणि इतर अनेक रूपांनी स्वतःचे अद्वितीयत्व सिद्ध केलेले स्वर्गीय जनार्दन भगत हे जन्मदाते म्हणून आम्हाला लाभले हे आमचे भाग्य आहे आणि त्यासाठी आम्ही परमेश्वराचे कायम ऋणी आहोत. प्रत्येक पुण्यस्मरणाच्या दिवशी आपण सर्वजण या महामानवाच्या अस्तित्वाची आकांक्षा व्यक्त करतो आणि तेवढ्या प्रयोजनातूनच आपले मनोबल दृढ करण्यासाठी अल्पसा प्रयत्न करीत असतो. आपणा सर्वांना त्यात जरूर यश मिळेल हा आमचा अनुभवाधारित विश्वास आहे.



**–संजय जनार्दन भगत**
**संचालक, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक मंडळ, पनवेल**




## सावधान! एसीचा ब्लास्ट होण्यापूर्वी मिळतात ‘हे’ संकेत

वाढत्या उन्हामुळे सध्या घराघरांत एसीचा वापर वाढला आहे, मात्र गेल्या काही दिवसांत एसीमध्ये शॉर्ट सर्किट होऊन आग लागण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. उन्हाळ्यात



तापमान वाढत असल्याने एसीवर ताण येतो आणि तांत्रिक बिघाडामुळे त्याचे रूपांतर मोठ्या स्फोटात होऊ शकते. त्यामुळेच एसी ब्लास्ट होण्यापूर्वी काही विशिष्ट वॉर्निंग सिग्नल’ देतो, ते ओळखणे अत्यंत गरजेचे आहे.

**एसी सुरू असताना ‘या’ गोष्टींकडे लक्ष द्या**

जळल्याचा वास येणे : एसी सुरू केल्यानंतर किंवा इनडोअर युनिटच्या आसपास काहीतरी जळाल्यासारखा वास येत असेल, तर लगेच सावध व्हा. ओव्हरहीटिंग किंवा अंतर्गत वायरिंगमध्ये बिघाड झाल्यामुळे असा वास येतो. एसी तत्काळ बंद करा.

**धूर निघताना दिसणे :** एसीमधून धूर निघणे ही धोक्याची सर्वात मोठी घंटा आहे. जर तुम्हाला थोडा जरी धूर दिसला, तर स्विच बंद करून मेन पॉवर सप्लाय खंडित करा.

**विचित्र आवाज येणे :** एसीमधून काहीतरी तुटल्याचा किंवा आदळल्याचा आवाज येत असेल, तर याचा अर्थ आतील एखादा भाग ढिला झाला आहे किंवा बिघडला आहे. सामान्य आवाजापेक्षा जास्त आवाज येणारा एसी वापरणे धोकादायक ठरू शकते.

**वारंवार ट्रिप होणे :** जर तुमचा एसी आपोआप वारंवार सुरू आणि बंद होत असेल, तर हे ओव्हरहीटिंगचे लक्षण आहे. कॉम्प्रेसरवर जास्त ताण आल्यास असे घडते व धोका वाढतो.

**गरम हवा किंवा कुलिंग न होणे :** खूप वेळ चालूनही एसी गार हवा देत नसेल, तर गॅस गळती असू शकते तसेच एसीमधून गरम हवा येणे हे मशीन ओव्हरहीट झाल्याचे लक्षण आहे.

**पाणी गळती आणि ठिणग्या :** एसीमधून पाणी गळत असल्यास आतील इलेक्ट्रॉनिक भागांमध्ये ओलावा जाऊन शॉर्ट सर्किट होऊ शकते. तसेच जर तुम्हाला स्विच बोर्ड किंवा एसी युनिटमध्ये ठिणग्या दिसल्या, तर तो गंभीर तांत्रिक बिघाड आहे.

**बचावासाठी काय कराल?**

उन्हाळा सुरू होण्यापूर्वी आणि सुरू असताना एसीची रेग्युलर सर्व्हिसिंग करून घ्या. एसीचे फिल्टर्स वेळोवेळी स्वच्छ करा. एसीसाठी दर्जेदार वायरिंग आणि स्टेबलायझरचा वापर करा. खूप जास्त वेळ सतत एसी सुरू ठेवणे टाळा, मधूनच त्याला विश्रांती द्या. तुमची थोडीशी सतर्कता एका मोठ्या अपघातापासून तुमचे आणि तुमच्या कुटुंबाचे रक्षण करू शकते.

# ललित लेखिका दुर्गा भागवत

एक विदुषी तसेच लोकसाहित्य, बौद्ध वाङ्मय, समाजशास्त्र इ. विषयांच्या अभ्यासक आणि ललित लेखिका म्हणून अधिकाराने ज्यांचे नाव घेतले जाते त्या दुर्गा भागवत हे महाराष्ट्राला परिचित असेच नाव आहे. दुर्गाबाईंचा जन्म १० फेब्रुवारी १९१० रोजी इंदूर येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण नगर, धारवाड, नाशिक, पुणे अशा विविध गावी झाले. मुंबईच्या सेंट झेव्हियर्समधून बी. ए. ला संस्कृत विषय घेऊन त्यांनी पदवी मिळवली. ‘अर्ली बुद्धिस्ट ज्युरीस्प्रूडन्स’ या विषयावर प्रबंध लिहून एम. ए. ची पदवीही त्यांनी मिळवली. इंग्रजी, मराठी, संस्कृत, पाली, बंगाली आणि गुजराती भाषा त्यांना अवगत होत्या. परंतु दुर्गाबाईंनी आपले लेखन मुख्यतः मराठी व इंग्रजी भाषेतून केले. त्यांची प्रकाशित पुस्तके शंभरच्या वर आहेत. त्यांनी स्फुटलेखनही बरेच केले. ‘ऋतुचक्र’, ‘व्यासपर्व’, ‘भावमुद्रा’, ‘डूब’ अशा दहा संग्रहातून त्यांनी ललितलेखन केले आहे.

मराठी लघुनिबंधाचे पूर्वीचे रूप बदलून तो वास्तव, अनुभवनिष्ठ आणि चितनात्मक करण्यात दुर्गाबाईंचे योगदान मोठे आहे. तसेच अतिशय ज्ञानलालसा आणि अनुभवसंपन्न जीवन यामुळे लोकसाहित्य, बौद्धधर्म, संस्कृत वाङ्मय इ. अनेक



## निमित्त

विषयांवरही त्यांचे लेखन संदर्भांनी परिपूर्ण असेच झालेले दिसते. निसर्ग सौंदर्याचा चित्रदर्शी प्रत्यय देणारे ‘ऋतूचक्र’ काय किवा महाभारतातील व्यक्तिरेखा वेगळ्याच दृष्टीने पेश करणारे ‘व्यासपर्व’ काय किवा साहित्य अकादामी पुरस्कार प्राप्त, वाचकाला चितन करायला लावणारे ‘पैस’ काय; हे ग्रंथ म्हणजे दुर्गाबाईंच्या लेखनाचा परीस स्पर्श झालेले अक्षरवाङ्मयच आहे. या व्यतिरिक्त लोकसाहित्य हा त्यांच्या अभ्यासातील आवडीचा विषय. तामिळी, पंजाबी, बंगाली, गुजराती, आसामी आणि काश्मिरी या अनेक प्रदेशातील लोककथा त्यांनी मराठीत आणल्या. रामायण, महाभारत, पुराण या वाङ्मयातील कथांचे अनुवाद त्यांनी केले. तर हेन्री डेव्हिड थोरो या अमेरिकन लेखकाच्या पुस्तकाचे ‘वॉल्डनकाठी विचारविहार’ हा अनुवादही त्यांनी केला. बाणाच्या कादंबरीचा अनुवाद, तसेच श्री. व्यं. केतकर ह्यांच्या कादंबर्यांची समीक्षा करणारे ग्रंथ इ. महत्त्वपूर्ण लिखाण त्यांनी केले. सिद्धार्थ जातकाच्या सात खंडाचा अनुवाद हे दुर्गाबाईंचे फार मोठे कार्य आहे. जातकाच्या एकूण ५४७ कथांपैकी ५४४ कथांचा सटीप अनुवाद त्यांनी केला.

लेखनाबरोबरच दुर्गाबाई भरतकाम, विणकाम, पाककला, लोकसंस्कृती, प्राणीजीवन आणि वनस्पती जीवनाचा त्यांचा अभ्यास होता. भावोत्कटता, चितनशीलता आणि संवेदनाप्रधान यामुळे त्यांचे लेखन लोकप्रिय झाले. त्यांची जिज्ञासा इतकी उच्च कोटीची होती की, आपल्या प्राणांचंही मोल द्यायची वेळ आली तरी आपण एखादी गोष्ट जाणून घेतल्याशिवाय राहणार नाही असा त्यांचा दंडक होता. १९७५ मधील आणीबाणीच्या काळात झालेल्या मुस्कटदाबीच्या विरोधात दुर्गेचा अवतार धारण करून शासनाविरूद्ध आवाज उठविणार्या त्या पहिल्या साहित्यिक होत्या. त्याबद्दल त्यांनी तुरुंगवासही भोगला होता. अशा या महाराष्ट्रातील सरस्वतीचे, दुर्गेचे ७ मे २००२ रोजी निधन झाले.

(साभार : इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### सतत तोंड येतंय..., ‘हे’ उपाय करा!

तोंडात लहान-लहान पांढरे फोड येणे, जळजळ होणे, खाणं-पिणं ही त्रासाचं होतं. या अवस्थेला आपण साधारण तोंड येणे म्हणतो. उष्णता वाढणे, तिखट-आंबट पदार्थ जास्त खाणे, पाण्याची कमतरता, झोप न होणे किंवा ताण यामुळे हा त्रास होऊ शकतो. जरी हे फोड काही दिवसांत आपोआप बरे होत असले, तरी त्या काळात होणारी वेदना खूप त्रासदायक असते. अशा वेळी काही सोपे घरगुती उपाय उपयोगी पडतात. पोट साफ नसेल तरी उष्णतेचा त्रास होतो, तोंड येते.



सर्वात सोपा उपाय म्हणजे थंडावा देणाऱ्या गोष्टींचा वापर. नारळाचं पाणी पिणं किंवा ताजं दही खाणं यामुळे शरीरातील उष्णता कमी होते आणि तोंडातील जळजळही कमी होते. त्याचप्रमाणे तुपाचा वापरही खूप फायदेशीर ठरतो. थोडंसं शुद्ध तूप थेट फोडांवर लावल्यास त्या भागाला ओलावा मिळतो आणि वेदना कमी होतात.

मध हादेखील एक प्रभावी घरगुती उपाय आहे. मधामध्ये नैसर्गिक जंतुनाशक गुणधर्म असतात. दिवसातून दोन-तीन वेळा थोडासा मध फोडांवर लावल्यास ते लवकर भरून येण्यास मदत होते. त्याचबरोबर हळदीचा वापरही करता येतो. हळद आणि थोडं पाणी किंवा मध मिसळून पेस्ट तयार करून फोडांवर लावल्यास सूज आणि वेदना कमी होतात.

तुळशीची पानेही या त्रासावर उपयोगी ठरतात. दोन-तीन तुळशीची पाने चावून खाल्ल्यास तोंडातील जंतू कमी होतात आणि फोड लवकर बरे होण्यास मदत होते. तसेच कोमट पाण्यात मीठ घालून गुळण्या केल्यास तोंड स्वच्छ राहते आणि जखमा लवकर भरतात. मात्र मीठामुळे झोंबते. त्याची काळजी घ्या. त्याच प्रमाणे पेरुची पाने चावून खाणेही फायद्याचे आहे. तोंड आल्यावर त्यात जंतू होतात. त्यामुळेही त्रास होतो. म्हणून अँटीसेप्टीक गुणधर्म असलेले पदार्थ वापरावेत.

या काळात आहाराकडे विशेष लक्ष देणंही तितकंच महत्त्वाचं आहे. खूप तिखट, आंबट किंवा गरम पदार्थ टाळावेत. त्याऐवजी साधं, मऊ आणि थंडसर अन्न घ्यावं. भरपूर पाणी पिणं, फळं आणि भाज्यांचा समावेश करणं यामुळे शरीरातील उष्णता नियंत्रणात राहते. तोंड येणं हा साधारण त्रास असला तरी वारंवार होत असेल किंवा खूप दिवस बरा होत नसेल, तर डॉक्टरांचा सल्ला घेणं आवश्यक आहे. मात्र रोजच्या आयुष्यात काही सोप्या सवयी आणि घरगुती उपाय अवलंबले, तर हा त्रास लवकर कमी करता येतो आणि पुन्हा होण्याची शक्यताही कमी होते.

# ऐनाचीवाडीतील महिलांचे श्रम होणार कमी!

## ७० कुटुंबांना 'वॉटर व्हील'चे वितरण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील अतिशय दुर्गम आदिवासीबहुल भागातील ओलमण ग्रामपंचायतमधील ऐनाचीवाडी येथील गावकऱ्यांना विशेषतः महिलांना पाणी लांबून साधारणतः ५०० मीटर अंतरावरून डोक्यावर वाहून आणावे लागते. ज्यात महिलांना जास्त त्रास होतो. याची दखल घेत युनायटेड वे मुंबई संस्थेने महिलांचे श्रम कमी करण्यासाठी ऐनाचीवाडी येथील प्रत्येक कुटुंबाला 'वॉटर व्हील' उपलब्ध करून दिले, जेणेकरून महिलांचे श्रम, वेळ आणि त्रास वाचेल.



ऐनाचीवाडी येथील गावकरी सहाय्यक राज्य कर आयुक्त नयन वाघ यांच्या पुढाकाराने गावात सदर कार्यक्रम आयोजित करण्यात आले ज्यात हे एकूण ७० कुटुंबांना 'वॉटर व्हील' वितरीत करण्यात आले. याप्रसंगी युनायटेड वे मुंबई संस्थेचे प्रतिनिधी विवेक कोळी यांनी उपस्थितांना संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांची माहिती दिली त्यात स्वयंसहायता गटाद्वारे रोजगार निर्मिती, जल आणि मृदा संवर्धन, शौचालय, शाळांसाठी राबविलेले विविध उपक्रम इ.बद्दल सविस्तर माहिती दिली. जोएब दाऊदी यांनी 'हवामान बदलामुळे शेतीवर होणाऱ्या दुष्परिणामांना कसे टाळता येऊ शकते आणि कमी खर्चात फायदेशीर शेती कशी करता येईल. याविषयी थोडक्यात सांगितले.

ऐनाचीवाडी येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक दिनेश माळी यांनी पाण्याचे महत्त्व अधोरेखित करतांना तिसरे महायुद्ध पाण्यामुळे होणार याबद्दल सांगितले, शिक्षक स्वप्नील पितळे यांनी शाळेत सौर प्रकल्प आणि आधुनिक तंत्रज्ञानचा उपयोग करून डिजिटल शाळाद्वारे ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक गुणवत्ता कशी वाढवता येईल याबद्दल सांगितले.

गाव विकसित करण्यासाठी काय करता येईल याबद्दल गावकऱ्यांशी खुली चर्चा केली असता सार्वजनिक ठिकाणी कचरापेटी लावणे, वैयक्तिक शौचालय बांधणे, विद्यार्थ्यांना विशेषतः मुलींना शाळेत जाण्यासाठी सायकल उपलब्ध करणे, शाळेला सोलर लाईट किट उपलब्ध करणे, पावसाळ्यात भाजीपाला उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना उच्च गुणवत्तेचे बियाणे उपलब्ध करणे, गाव शेजारी असलेल्या बंधारामधील गाळ काढणे, शालेय साहित्य उपलब्ध करणे असे विविध महत्त्वाचे विषय निघून आले. या कार्यक्रमात महिलांची उपस्थिती आणि सक्रियता पुरुषवर्गा पेक्षा जास्त आणि लक्षवेधी होती त्याचे कारण जाणून घेतले असता निदर्शनास आले कि नयन वाघ आणि पूनम वाघ हे दांपत्य मागील दोन महिन्यापासून रोज संध्याकाळी गावात प्रौढ शाळा चालवीत असून त्यात प्रौढ महिलांची साक्षरता, संभाषण कौशल्य तसेच सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास कसे करता येईल यावर भर देत आहेत आणि त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत.

सदर कार्यक्रमास ओलमण गृप ग्रामपंचायत सरपंच बेबी पादीर, गावाचे पोलीस पाटील जनार्दन पारधी, शालेय समिती अध्यक्ष कैलास लचका, डोंगरपाडा आश्रम शाळेचे शिक्षक सुरेश पादीर आणि ग्रामस्थांचा समावेश होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाघ दाम्पत्याने केले.

# महाडमध्ये शिवशाही बस आणि रिक्षाची धडक

**महाड : प्रतिनिधी**



महाड शहराजवळील नातेखिंड उड्डाणपुलाखालील मुंबईकडून महाडकडे येणाऱ्या सर्विस रोडवर सकाळच्या सुमारास बोरिवली महाड या राज्य परिवहन मंडळाच्या शिवशाही बस आणि एका ऑटो रिक्षामध्ये जोरदार धडक झाली आहे. यामध्ये रिक्षाचालक गणेश कदम राहणार मोहोप्रे, महाड हे किरकोळ जखमी झाले आहेत, मात्र रिक्षाचे मोठे नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. घटनेची माहिती मिळताच एसटी महामंडळ अधिकारी व पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार बुधवारी सकाळी ९.४५ वाजता मौजे करंजखोल गावच्या हद्दीत मुंबई–गोवा महामार्गावर बोरिवली वरून येणाऱ्या महाड या शिवशाही बस क्रमांक एमएच ०९ एफएल ०५३२ ही बस सर्विस रोड वरून येत असताना विरुद्ध दिशेने येणाऱ्या रिक्षा क्रमांक एमएच एफई ८००० चालक

### रिक्षाचालक किरकोळ जखमी

गणेश धोंडू कदम राहणार मोहोप्रे याने रस्त्याकडे दुर्लक्ष करीत विरुद्ध दिशेने अचानक येऊन शिवशाही बसला धडक दिली. या अपघातात रिक्षाचे मोठे नुकसान झाले असून, चालक कदम हा किरकोळ जखमी झाला आहे.

रिक्षाचालकाने या सर्विस रोडवर विरुद्ध दिशेने येऊन हा अपघात झाल्याने या अपघातास रिक्षाचालक कारणीभूत असल्याने याप्रकरणी रिक्षाचालकावर गुन्हा दाखल होणे गरजेचे आहे. अशाच पद्धतीने मुंबई–गोवा महामार्गावर महाड शहरालगत सर्व्हिस रोड वरती अनेक वाहने विरुद्ध दिशेने प्रवास करत असतात. यामध्ये ज्या पद्धतीने खाजगी वाहने, त्याचप्रमाणे प्रवासी वाहने देखील विरुद्ध दिशेने प्रवास करत असतात. सहा आसणी मिनिडोअर, ऑटो रिक्षा, स्कूल बस अशी वाहने अनेक ठिकाणी विरुद्ध दिशेने प्रवास करत असतात. या त्यांच्या हलगर्जीपणामुळे अपघात झाल्यास यामध्ये प्रवाशांची मोठी जीवित हानी होऊ शकते. या प्रकरणी महामार्ग वाहतूक विभाग, पोलिस तसेच परिवहन विभागाने लक्ष घालून संबंधित सर्विस रोड हे एक दिशा मार्ग करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

# नसरापूरच्या नराधमाला फाशीची शिक्षा द्या!

## आरपीआयची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

पुणे येथील भोर तालुक्यातील नसरापूर गावामधील घटनेतील सैतानाने केलेले कृत्य अतिशय गलिच्छ व विकृत आहे. या नराधमाला फाशीची शिक्षा व्हावी यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया कर्जत तालुक्याच्या वतीने कर्जत पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले.



या घटनेत चार वर्षाची मुलीवर अत्याचार करून दगडाने ठेचून चिमुकलीची निर्घृण हत्या करून तिला शेणाच्या ढिगाऱ्याखाली दडवून ठेवले. या नराधमास मृत्यूदंडाची शिक्षा व्हावी यासाठी निवेदन देतेवेळी रिपाइंचे कोकण कार्याध्यक्ष राहुल डाळिंबकर, जिल्हा सचिव सुनील सोनवणे, उपाध्यक्ष जयेश शिंदे, कर्जत तालुका महिला अध्यक्ष सुरेखा कांबळे, युवक अध्यक्ष अमर जाधव, ज्येष्ठ नेते दीपक भालेराव, माथेरान शहराध्यक्षा मनीषा शिंदे, नेरळ विभागीय महिला अध्यक्ष वंदना गायकवाड, कर्जत शहर महिला आघाडीच्या सेजल डाळिंबकर, सायली पाटील, समीक्षा कांबळे, पूजा गवळे, तालुका उपाध्यक्ष सुभाष पवार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खांडपोलीत शनिवारी भारतरत्न डॉ. आंबेडकर यांचा जयंती महोत्सव

**पाली : प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३५वा जयंती महोत्सव सर्वत्र साजरा होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती महोत्सवाच्या माध्यमातून लोककलावंत, गायक, प्रबोधनकार महामानवांचे विचार अविरतपणे लोकांपर्यंत पोहचवीत आहेत. महामानवांच्या विचारांचा जागर हा भीमगीतांतून, व्याख्यानांतून लोकांपर्यंत पोहचत आहे. सुधागड तालुक्यात बौद्ध ग्रामस्थ मंडळ खांडपोलीत दि. ९ मे रोजी भारतीय घटनेचे शिल्पकार बोधिसत्व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३५वा जयंती महोत्सव साजरा करण्यात येत आहे.

सदर जयंती महोत्सव अनिल मारुती वाणी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत असून विविधांगी उपक्रमातून साजरा करण्यात येणार आहे. या भीम महोत्सवासाठी प्रतिष्ठित मान्यवर व भीम अनुयायांना आमंत्रित करण्यात आले आहे. ॲड. अपर्णा वाणी व नरेंद्र वाणी सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करतील. तर प्रास्ताविक सुरेश वाणी, विजयी वाघमारे करणार असून कार्यक्रमासाठी आलेल्या पाहुण्यांचे स्वागत स्वागताध्यक्ष पी. सी. वाणी करतील. सकाळी १० वाजता पंचशील व निळ्या ध्वजाचे ध्वजारोहन करून बौद्धाचार्य गण व श्रामनेर संघ यांच्या उपस्थितीत बुद्ध पूजापाठ घेण्यात येईल.

सायंकाळी ४ वाजता महामानवांच्या प्रतिमेची भव्य मिरवणुक पेडली बाजरपेठेतून निघणार आहे. बौद्ध ग्रामस्थ मंडळाचे संस्थापक सी.जी. वाणी यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत नागरी सत्कार करण्यात येणार आहे. मान्यवरांच्या व भीम अनुयायांच्या उपस्थितीत जाहीर सभा व सत्कार समारंभ पार पडणार पडेल. रात्री १० वाजता लोकगायक दि. प्रल्हाद शिंदे यांचे चिरंजीव चंद्रकांत शिंदे यांच्या प्रबोधनात्मक भीमगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून सुप्रीम कमिटी कार्यकारी मंडळ, जयंती उत्सव कमिटी, बौद्ध ग्रामस्थ मंडळ सदस्य, युथ मंडळ, महिला मंडळाकडून भीम अनुयायांना उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मोबाइल यूटीएस सहाय्यकांमुळे ५.४० लाख प्रवाशांना सुविधा

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने यूटीएस प्रणाली, रेल वनसारखे मोबाइल तिकीट ॲप्स इत्यादी विविध उपायांद्वारे आपल्या प्रवाशांना तिकीट काढण्याची सुविधा सुलभ करण्यात नेहमीच पुढाकार घेतला आहे. तिकीट सुविधेमधील सर्वात नवीन भर म्हणजे मोबाइल यूटीएस सहाय्यक होय. मध्य रेल्वेने ही सुविधा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दिनांक ३१.१०.२०२५ रोजी सुरू केली असून, तिकीट खरेदीसाठी प्रतीक्षा करणाऱ्या प्रवाशांच्या सेवेसाठी ३ सहाय्यक तैनात केले आहेत. उन्हाळ्याच्या हंगामात प्रवाशांची अपेक्षित गर्दी आणि मिळालेला सकारात्मक प्रतिसाद लक्षात घेऊन जानेवारी २०२६ मध्ये आणखी ५ सहाय्यकांची भर घालण्यात आली, ज्यामुळे एम–यूटीएस सहाय्यकांची एकूण संख्या ८ झाली आहे.




३१ ऑक्टोबर ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत, या एम–यूटीएस सहाय्यकांनी प्रत्येक प्रवाशाकडे जाऊन सोपी आणि जलद तिकीट सेवा पुरवून ५.४० लाख प्रवाशांना ३.८६ लाख तिकिटे जारी केली आहेत आणि मध्य रेल्वेच्या वाणिज्यिक महसुलात ६.८९ कोटी रुपयांची भरीव भर घातली आहे. केवळ एप्रिल महिन्यातच १.७२ लाख प्रवाशांसाठी एकूण १.२५ लाख तिकिटे जारी करून २.२२ कोटी रुपयांचा महसूल गोळा करण्यात आला आहे.

एम–यूटीएस सहाय्यकांना मोबाईल फोन आणि एक लहान तिकीट छपाई मशीन पुरवले जाते. हे एम–यूटीएस सहाय्यक कॉनकोर्समध्ये, होल्डिंग एरियामध्ये किंवा रेल्वेच्या आवारात प्रत्येक व्यक्तीकडे जाऊन तिकीट भाडे घेऊन तिकिटे देतात. त्याशिवाय त्यांना काउंटरमध्ये बसून तिकीट देण्याची परवानगी देखील आहे. प्रवाशांना डिजिटल किंवा रोख पेमेंटचा पर्याय उपलब्ध आहे.

मध्य रेल्वेच्या या उपक्रमाने जलद आणि सोयीस्कर तिकीट सुविधा देण्यासोबतच तिकीटविरहित प्रवासाला आळा घालण्यासही मदत केली आहे. जागेवरच तिकिटे सहज उपलब्ध झाल्यामुळे, तिकिटांच्या लांब रांगा आणि प्रवाशांच्या प्रचंड गर्दीमुळे तिकीटविरहित प्रवास करणाऱ्यांची संख्या कमी झाली आहे.

मोबाईल यूटीएस सहायकांची सुविधा हा मध्य रेल्वेचा तिकीट प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि त्याद्वारे आपल्या प्रवाशांना उत्तम सुविधा देण्यासाठीचा आणखी एक प्रवासी–स्नेही उपक्रम आहे. प्रवाशांना मोबाईल यूटीएस सहायकांच्या सेवांचा लाभ घेण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे, कारण ही सेवा सोयीस्कर आणि वेळ वाचवणारी आहे.

# कर्जतमधून व्यक्ती बेपत्ता

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोलीस ठाणे हद्दीतील कल्पवृक्ष नगर भागातून एक व्यक्ती हरवली आहे. या व्यक्तीचा शोध घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

विशाल दिलीप तेजाळे (४४) ही व्यक्ती कर्जत कल्पवृक्ष नगर भागातून हरवली. ३ मे रोजी दुपारी सुमारे १ वाजता ते घरातून बाहेर पडले असून त्यानंतर परत आलेले नाहीत. हरवलेल्या व्यक्तीची उंची अंदाजे पाच फूट सात इंच असून रंग सावळा आहे, तर केस काळे, अंगावर फिकट रंगाचा शर्ट, निळी पॅन्ट व राखाडी रंगाचा जॅकेट आहे.

**नमुना एन. डी.**

(नियम ९२(३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, मोटार वाहन क्र. MH46 BU 1521 चे मालक **मनीष रामलाल जयस्वाल** यांचे तारीख १३/०१/२०२६ रोजी निधन झालेले आहे.

मी **ममता मनीष जयस्वाल**, पत्ता : जी–००४, सर्व्हे नं. १५/१६, फ्लॉरा, रसायनी गार्डन, चांभार्ली, रायगड ४१०२२२ (महाराष्ट्र) उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पनवेलच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – ममता मनीष जयस्वाल**,
पत्ता : जी–००४, सर्व्हे नं. १५/१६, फ्लॉरा,
रसायनी गार्डन, चांभार्ली, रायगड ४१०२२२
(महाराष्ट्र)

# रायगडामध्ये अवतरली निसर्गचक्राची अद्भुत किमया

## नवरंग आणि पट्टेरी कोकीळचे आगमन

**पाली : प्रतिनिधी**

जलनिसर्गाचा लहरीपणा आणि बदलत्या वातावरणाचा थेट परिणाम आता पक्ष्यांच्या स्थलांतरावर होऊ लागल्याचे चित्र रायगड जिल्ह्यात दिसत आहे. दरवर्षी मान्सूनच्या आगमनाची चाहूल घेऊन येणारे नवरंग, पट्टेरी कोकीळ यांसारख्या स्थलांतरित पक्ष्यांचे आगमन सुरू झाले आहे. पाली सुधागडसह रायगडच्या जंगलांमध्ये या रंगीबेरंगी पाहुण्यांचा किलबिलाट सुरू झाल्याने पक्षी निरीक्षक आणि अभ्यासकांमध्ये कुतूहलासोबतच चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.



रोहा येथील पक्षी निरीक्षक रोशन म्हात्रे यांना रोहा, फणसाड अभयारण्य आणि रायगड जिल्ह्याच्या विविध भागांत या पक्ष्यांचे दर्शन झाले आहे. म्हात्रे यांच्या मते, हे पक्षी पावसाळ्याचे दूत मानले जातात. मात्र, यंदा हवामानातील बदलामुळे त्यांच्या जीवनचक्रावर विपरीत परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. या बदलांबाबत सखोल अभ्यास होणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, या पाहुण्यांना पाहण्यासाठी आणि त्यांचे छायाचित्रण करण्यासाठी रायगडच्या जंगलात अभ्यासक व पर्यटकांची गर्दी वाढू लागली आहे. यंदा या पक्ष्यांचे दर्शन सुखावह असले, तरी वाढती उष्णता हे पर्यावरणीय धोक्याचे संकेत तर नाहीत ना, याकडे तज्ज्ञांचे बारीक लक्ष आहे, असे रोशन म्हात्रे यांनी सांगितले.

माणगाव येथील पक्षी अभ्यासक शंतनू कुवेस्कर यांनी या स्थितीवर भाष्य करताना वाढत्या तापमानाबाबत चिंता व्यक्त केली आहे.

### पक्ष्यांची वैशिष्ट्ये

नवरंग याला 'नऊ रंगांचा पक्षी' म्हटले जाते. हिरवा, निळा, पिवळा, काळा आणि लाल अशा गडद रंगांच्या छटा याच्या अंगावर असतात. हे पक्षी प्रामुख्याने दक्षिण भारत आणि श्रीलंकेतून प्रजननासाठी उत्तर व मध्य भारताकडे स्थलांतर करतात. पट्टेरी कोकीळ अंगावर पांढऱ्या आणि तपकिरी रंगाचे आडवे पट्टे असलेला हा पक्षी आपल्या सुश्राव्य लयीसाठी ओळखला जातो. हे पक्षी हवामानानुसार स्थानिक स्थलांतर करतात. बुरखाधारी हळद्या हा प्रामुख्याने निवासी पक्षी असला तरी पावसाळ्यात अन्नाच्या शोधात स्थलांतर करतो. पिवळा देह व डोक्यावर काळ्या रंगाचा 'बुरखा' ही ओळख असून याचा आवाज बासरीसारखा मंजूळ असतो.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे रोहिंजन, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत आहे. सदरहू मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालक भास्कर महादू म्हात्रे वगैरे यांचेकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे रोहिंजन, ता. पनवेल, जि.रायगड येथिल खालील वर्णनाची मिळकत.**

| गट नं./ हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ . | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| ६६/४ | १–५४–४०<br>पो.ख. ०–०५–१०<br>**एकुण १–५९–५०**<br>**पैकी १–३७–००** | ११.६३ |

तरी सदर मिळकती संबंधी कोणाही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण दान, बक्षीस, खरेदीखत, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मुत्युपत्र बोजा अथवा अन्य कोणत्याहि प्रकारचा कायदेशीर हक्क – हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती अशा हरकती मध्ये नमुद केलेल्या हक्कांबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ०८ दिवसांचे मुदतीत प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात या प्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व वरील मुदती नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

पनवेल,
तारीखः ०७/०५/२०२६

**सही/–**
**ॲड. कोंडे देशमुख**

ए/४, जाई नगर सोसायटी, किनारा सोसायटी समोर, ५२ बंगलो, कोर्ट रोड, जुने पनवेल, जि. रायगड. ४१०२०६ मो.: ९९२०३३४९३३.
Email : prasadkondedeshmukh@gmail.com

**पनवेल महानगरपालिका**
तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | कार्यकारी अभियंता, पनवेल महानगरपालिका, पनवेल | ०२ नारळ,०४ पिंपळ,०१ बदाम,०१ सिताफळ,०१ उंबर व ०१ जांभूळ अशी एकूण १० झाडे तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'ड', येथील धूतपापेश्वर ते विरुपाक्ष मंदिर व बांठिया बंगला ते श्री लक्ष्मी नारायण मंदिर, पनवेल येथील १० झाडे रस्त्यांचे क्रॉंक्रिटीकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणेकामी बाधित होत आहेत. |
| २ | श्री. आशिष व्होरा, प्लॉट नं.९१, जवाहर को.ऑप.इंडस्ट्रिअल इस्टेट, कामोठे, नवी मुंबई–४१०२०९ | ०१ आंबा झाड तोडणे. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं. – ९१, जवाहर को. ऑप. इंडस्ट्रिअल इस्टेट, कामोठे, नवी मुंबई या भूखंडाच्या आवारातील ०१ झाड नविन शेड बांधकाम करणेस बाधित होत आहेत. |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर करावयात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०६/०५/२०२६

**सही /–**
**(स्वरुप खारगे)**
उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी
पनवेल महानगरपालिका

PMC-PARK/190/2026-PTAD

# नवी मुंबईचा गतिमान विकास

## नागरी सुविधा कामे, प्रकल्पांची आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्याकडून पाहणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिका क्षेत्रातील नालेसफाईची कामे गतीने सुरु असून आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी विविध नागरी सुविधा कामे व प्रकल्पांची पाहणी करताना कोपरी व सेक्टर १७ वाशी येथील नालेसफाई कामांची पाहणी करीत काढलेला गाळ काहीसा सुकल्यानंतर लगेच उचलून नेण्याचे निर्देश दिले. यावर्षी नाल्यांमधील गाळ काढण्याचे काम मोठया प्रमाणात करण्यात येत असून त्यामुळे पावसाळी कालावधीत अडचण होणार नाही, असा विश्वास आयुक्तांनी व्यक्त केला.



सकाळी ८ वाजता घणसोली ऐरोली खाडीवरील पामबीच संलग्न ब्रीजच्या कामापासून पाहणी दौऱ्यास सुरुवात करताना त्या ठिकाणी बनवायच्या ८९ पिअर्सपैकी ४४ पिअर्सचे काम पूर्ण झाले असून उर्वरित पिअर्सचे फाऊन्डेशनपर्यंत आलेले काम जून अखेरीस पिअर कॅपपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. त्याचप्रमाणे पावसाळी कालावधीत स्पाईन, विंग व गर्डर कास्टींगचे काम पूर्ण करावे अशाही सूचना देण्यात आल्या.

तळवली नाका येथे प्रवेशव्दाराजवळ चौकात होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या ठिकाणाला भेट देत नागरिकांना होणारा त्रास दूर करण्यासाठी आयआयटी तज्ज्ञांची मदत घेऊन आराखडा तयार करावा व त्याची लवकरात लवकर अंमलबजावणी करावी तसेच रस्त्याच्या दुतर्फा वाहने उभी केल्याने वाहतूक कोंडीत अधिक भर पडते हे लक्षात घेत त्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करावी असेही निर्देश देण्यात आले. कोपरी स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या मृत व्यक्तींच्या कुटुंबियांसाठी स्नानगृह व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याचे तसेच अस्थी ठेवण्यासाठी लॉकरची व्यवस्था करण्याचेही आयुक्तांनी सूचित केले.

कोपरी गावातील नाला, कोपरी सिग्नल पेट्रोल पंपासमोरील नाला, सेक्टर २९ येथील नाला तसेच सेक्टर १७ वाशी येथील नाला व सेक्टर ११ सानापडा येथील नाल्याची पाहणी करताना खोलवर जाऊन गाळ काढावा व तो थोडासा सुकल्यानंतर लगेच उचलून न्यावा असे आयुक्तांनी सूचित केले. नाल्याच्या कडेला असलेली झाडेझुडपे छाटणी करुन घ्यावीत तसेच कोपरी पेट्रोल पंपासमोरील नाल्याच्या दोन्ही बाजूला लोखंडी जाळया लावाव्यात व पुलावरील भिंत उंच करावी असेही आयुक्तांनी सूचित केले. कोपरी गावातील नाला व सेक्टर १७ मध्यवर्ती नाला वाशी यांच्या एका बाजूस कुंपण भिंत आहे तशीच कुंपण भिंत रस्त्याकडील दुसऱ्या बाजूसही उभारावी अशाही सूचना आयुक्तांनी केल्या.

> *धारण तलावांमधील गाळ काढण्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून हा गाळ काढण्याचे नियोजन प्रशासनाने हाती घेतले आहे.*
> *धारण तलावांमध्ये कांदळवन तयार झाल्याने वनखाते आणि सर्वोच्च न्यायालयाकडून आवश्यक परवानग्या मिळाल्यानंतर ते हटविण्याचे काम हाती घेतले जाईल. यासाठी प्रशासनाकडून पाठपुरावा सुरू असून येत्या वर्ष–दीड वर्षात धारण तलावांचे रुंदीकरण करण्यात येईल.*
> **–डॉ. कैलास शिंदे,** *आयुक्त, नमुंमपा*

नाल्यामधून स्वच्छ पाणी वाहते राहील याकडे विशेष लक्ष देण्याच्या दृष्टीने एमआयडीसी, एमपीसीबी व महानगरपालिका अशा तिन्ही प्राधिकरणांच्या अभियंत्यांनी नाल्याचा उगम होतो तिथून खाडीपर्यंत पाहणी करुन ज्या ठिकाणी नाले दूषित होतात अशा जागी छोटे मलप्रक्रिया युनिट उभारुन नाल्यात येणारे पाणी स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी असे निर्देश आयुक्तांनी सार्व. आरोग्य अभियांत्रिकी विभागाला दिले.

कोपरी येथील ॲम्युझमेंट पार्कची पाहणी करताना त्यामध्ये अनेक सुधारणा आयुक्तांनी सूचविल्या व त्यामधील कासवाच्या भव्य प्रतिकृतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करून घ्यावे असे निर्देश दाले. सेक्टर २९ वाशी येथील आयुष्मान आरोग्य मंदीराची पाहणी करताना त्याच्या आसपासचा परिसर सुशोभित करावा असे सूचित करण्यात आले. सेक्टर ७ वाशी येथील अंडरपासचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन त्याच्या दुरुस्तीबाबतची कार्यवाही करावी तसेच वाशीगाव येथील तात्पुरत्या स्वरुपात सुरु असलेल्या भाजी व मासळी मार्केटची पाहणी करताना सुस्थितीतील मार्केट उभारण्यासाठी सिडकोकडून भूखंड घ्यावा, असेही आयुक्तांनी सूचित केले.




## नेरूळमध्ये वाईन शॉपविरोधात आंदोलन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ सेक्टर ४ मधील रहिवासी परिसरात सुरु करण्यात आलेल्या जयेश वाईन शॉप द लिकर स्टोअरविरोधात स्थानिक नागरिकांनी मंगळवारी तीव्र आंदोलन छेडले. 'साई पॅराडाईज को–ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी' आणि 'कॉमन सिटीझन्स असोसिएशन' यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन उभारण्यात आले असून स्थानिक नगरसेवक अभिजीत देसाई यांनीही रहिवाशांच्या बाजूने ठाम भूमिका घेत या लढ्याला सक्रिय पाठिंबा दर्शविला.

नेरूळ सेक्टर ४ मधील वेलनेस मेडिकलजवळ, साई पॅराडाईज सोसायटीच्या मुख्य प्रवेशद्वाराशेजारी आणि शालेय बसस्टॉपसमोर हे वाईन शॉप सुरू करण्यात आले आहे. इतक्या संवेदनशील ठिकाणी दारूचे दुकान सुरू होणे हे सामाजिक सुरक्षिततेच्या दृष्टीने गंभीर असून यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक आणि शाळकरी मुलांच्या सुरक्षेला धोका निर्माण होऊ शकतो. स्थानिक रहिवाशांचा तीव्र विरोध असतानाही आणि संबंधित सोसायट्यांकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' न मिळूनही हे दुकान सुरू करण्यात आले. नागरिक सह्यांची मोहीम सुरू करणार आहेत.

## नेरूळमध्ये छाटलेल्या फांद्या न उचलल्याने पादचाऱ्यांची गैरसोय

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



नेरूळ परिसरातील गावदेवी मंदिरालगतच्या पदपथावर छाटलेल्या झाडाचे खोड आणि फांद्या गेल्या १५ दिवसांपासून पडून असल्याने पादचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः परिसरातील उद्यानात जाणारे नागरिक आणि सकाळच्या वेळी चालण्यासाठी बाहेर पडणारे जेष्ठ नागरिक यांना याचा मोठा फटका बसत आहे.

गावदेवी मंदिराच्या संरक्षक भिंतीवर सुरक्षा जाळी बसवण्यासाठी अडथळा ठरणाऱ्या झाडाच्या फांद्यांची छाटणी करण्यात आली होती. मात्र छाटणीनंतर उरलेले खोड आणि फांद्या पदपथावरच टाकून देण्यात आले. विशेषतः सकाळी चालण्यासाठी बाहेर पडणाऱ्या जेष्ठ नागरिकांनी याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. तसेच लहान मुलांना उद्यानात घेऊन जाणाऱ्या पालकांनाही मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

## दिघा गाव रेल्वेस्थानकासमोरील चौकात वाहतूक कोंडी

### अपघात टाळण्यासाठी पादचारी पूल उभारण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

ट्रान्स हार्बर मार्गावर ठाणे व ऐरोलीच्या मध्ये एमआरव्हीसीच्या माध्यमातून दिघागाव रेल्वेस्थानक साकारण्यात आले आहे. हे रेल्वेस्थानक सुरू होऊन जवळपास दोन वर्षे झाली तरी सद्यस्थितीत दिघा गाव रेल्वेस्थानकात जाणाऱ्या नागरिकांना ठाणे–बेलापूर मार्ग ओलांडून जावे लागत आहे. जीव मुठीत धरून पादचारी रस्ता ओलांडत असतात.

पादचाऱ्यांमुळे सकाळ–संध्याकाळी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. यामुळे वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. दिघा गाव रेल्वेस्थानकाच्या चौकात सकाळ संध्याकाळच्या सुमारास वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी वाहतूक पोलीस तैनात असतात. रेल्वेस्थानकासमोर वाहनचालकांसाठी सिग्नल यंत्रणाही बसवण्यात आली आहे, पण सिग्नल यंत्रणेचा वापर होत नाही. यामुळे येथे वाहतूक कोंडीत आणखी भर पडत आहे.

दिघा गाव रेल्वेस्थानक झाल्यानंतर येथील वाहतूक कोंडी सुटेल असे वाटले होते, मात्र याच्या उलट चित्र दिघा गाव रेल्वेस्थानकाजवळील चौकात झाले असून येथे वाहतूक कोंडी ही नित्याचीच झाली आहे. त्यामुळे या ठिकाणी पादचारी पुल साकारण्यात यावा, अशी मागणी सर्वसाधारण सभेत ठरावाच्या माध्यमातून नगरसेविका ॲड. श्वेता काळे यांनी केली आहे.



नवी मुंबई महापालिका व ठाणे महापालिका यांच्या वेशीवर असणाऱ्या ठाणे–बेलापूर मार्गावर दिघा गाव रेल्वेस्थानक साकारण्यात आले आहे. दिघा रेल्वे स्थानकाच्या बाजूला असणाऱ्या ऐरोली नॉलेज पार्क परिसरात मोठ्या प्रमाणात आयटी कंपन्या असून तिथे हजारो कर्मचारी कामास आहेत. पूर्वेस आनंदनगर, गणपती पाडा, ईश्वरनगर, रामनगर या नागरी वसाहती आहेत. येथील नागरिक मोठया प्रमाणात या रेल्वे स्थानकांचा आधार घेत असतात.

या रेल्वेस्थानकात वाढलेल्या गर्दीमुळे सकाळ संध्याकाळी लोंढेच लोंढे रेल्वेस्थानकातून बाहेर पडत असतात. यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. ठाणे–बेलापूर मार्गावरील वाशीकडून ठाण्याकडे जाणाऱ्या मार्गावर रोजच कळव्यापासून दिघा परिसरापर्यंत वाहतूक कोंडी होत आहे. दिघा गाव रेल्वेस्थानक परिसरात नवीन इमारतीही बनत असल्यामुळे तेथीलही लोकसंख्या वाढणार आहे. त्यामुळे येथे वाहतूक कोंडी ही नित्याचीच होणार आहे. त्यावर तोडगा काढण्याची मागणी होत आहे.

> दिघा गाव रेल्वेस्थानकासमोर पादचारी पूल बांधण्यात यावा यासाठी महापालिकेकडे ठरावाच्या माध्यमातून मागणी केली आहे. पादचारी पुलाअभावी येथे पादचाऱ्यांच्या अपघाताला निमंत्रण मिळत आहे. येथील वाहतूक कोंडीही आता नित्याचीच झाली आहे. त्यामुळे येथे पादचारी पूल उभारण्यासाठी मागणी करण्यात आली आहे.
> **–ॲड. श्वेता काळे,** नगरसेविका

## डीपीएस फ्लेमिंगो तलावाचा विस्तार अंतिम टप्प्यात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

फ्लेमिंगो आणि इतर स्थलांतरित पक्ष्यांसाठी महत्त्वाच्या असलेल्या नेरूळ येथील डीपीएस तलावाच्या पाणथळ भागाचा विस्तार अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. सध्या सुमारे १२ हेक्टर असलेले हे क्षेत्र वाढवून जवळपास ३६ हेक्टर करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या अंतिम मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे.



मॅन्ग्रोव्ह सेल आणि वन विभागाने तयार केलेला सुधारित आराखडा ऑक्टोबर २०२५ मध्ये सादर करण्यात आला असून या प्रक्रियेची माहिती ही माहिती अधिकारातून नॅटकनेक्ट फाऊंडेशनला मिळाली आहे.

१७ एप्रिल २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य वन्यजीव मंडळाच्या बैठकीत या विस्ताराला तत्त्वतः मंजुरी देण्यात आली होती. त्यामुळे अंतिम निर्णय लवकरच होण्याची शक्यता आहे. दरम्यान, या भागाच्या वापराबाबत वाद निर्माण झाला आहे. सिडकोने या १२ हेक्टर क्षेत्राला 'भूखंड' म्हणून गणून व्यावसायिक मूल्यांकन केले असल्याचे समोर आले आहे. प्रति हेक्टर सुमारे ३०० कोटी रुपयांच्या दराने या क्षेत्राचे एकूण मूल्य सुमारे ३,६०० कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते. या मुद्द्यावर अधिवास संरक्षण आणि विकास यामधील चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. सिडको मंडळ हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अखत्यारीत असून वनमंत्री गणेश नाईक यांनी या पाणथळ भागाचे संरक्षण व्हावे अशी भूमिका घेतली आहे.

नवीन आराखड्यानुसार, या विस्तारित क्षेत्रात पाणी, कांदळवन, खाडी पट्टा आणि दलदलीचा भाग यांचा समावेश आहे. अधिकाऱ्यांच्या मते, यामुळे पाण्याची नैसर्गिक हालचाल, भरती–ओहोटीची प्रक्रिया आणि अधिवासाची सलगता टिकून राहण्यास मदत होईल.

## हिंदूंनी संघटित व्हावे –राजेश मुधोळकर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

हिंदूंना आपलं अस्तित्व टिकवून ठेवायची असेल तर येणाऱ्या काळात हिंदूंना संघटित होण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. सध्याचा काळ झपाट्याने हिंदू विरोधी होत आहे. सर्वत्र हिंदू विरोधी घटना सातत्याने घडत असताना आपण रोज बघत आहोत परंतु याचा म्हणावा तसा विरोध होताना दिसत नाही ह्याचं कारण म्हणजे हिंदू समाज संघटित नाही. लव जिहादसह आता लँड जिहाद सुद्धा सुरू झाल्याचे लक्षात येते, असे परखड विचार ॲड. राजेश मुधोळकर यांनी मांडले.

समग्र हिंदू संमेलन सानपाडा समितीच्या वतीने नुकतेच झाशी राणी खेळाच्या मैदानावर एक अतिशय सुंदर असे हिंदू संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनामध्ये प्रमुख वक्ता म्हणून बोलताना ॲड. राजेश मुधोळकर पुढे म्हणाले की, मशिदी किंवा चर्चेस प्रमाणे हिंदू देवालये ही हिंदूंची बलस्थानं व्हायला हवीत. याकरता सर्व हिंदूंनी नियमितपणे किंवा किमान आठवड्यातील एक दिवस देवालयात जाऊन सामूहिक प्रार्थना करायला हवी. यातूनच संघटन संभव आहे.

दुसरे प्रमुख वक्ते अभय जगताप यांनी आक्रमक शैलीत भाषण करताना असे विचार मांडले की सर्व हिंदूंनी आता आपसातील सर्व प्रकारचे भेद विसरून "मैं केवल हिंदू हूं" हीच धारणा अधिक बळकट करण्याची गरज आहे.आसपास घडलेल्या काही अनुचित घटनांचा संदर्भ देत शिव जगताप यांनी जागरूक पालक आणि सुसंस्कारित कुटुंबाची आवश्यकता अधोरेखित केली.

या संमेलनाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. त्यानंतर आदि गुरू शंकराचार्य यांच्या गुरुपादुका स्तोत्राने झाली. त्यानंतर सुभद्रा चौहान यांनी रचलेल्या खूब लड़ी मर्दानी वह तो झांसी वाली रानी थी आणि सरपे हिमालय का छात्र है, चरणों में नदियां एकत्र है, हाथों में वेदों के पात्र है, देश नहीं ऐसा अन्यत्र है। जय भारती वंदे भारती। ही दोन नृत्य गीत मोकाशी आणि पावसकर भगिनींनी आकर्षक पद्धतीने सादर केली. संमेलन आयोजन समितीचे अध्यक्ष दीपक शर्मा आणि सचिव हिमालय जोशी यांनी सर्वांचे आभार मानले.

## उष्माघातापासून काळजी घ्या!



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील अनेक भागात तापमान वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. हिट व्हेव किंवा उष्णतेची लाट ही एक मूक आपत्ती आहे. यामध्ये माणसांसोबतच पक्षी, प्राणी, वनस्पती यांची होणारी हानी मोठी आहे. साधारणपणे मार्च ते जून या मान्सून पूर्वकाळात या उष्णतेच्या लाटा येताना दिसतात.

लक्षणे : अति उष्णता आणि घाम:– सुरवातीला खूप घाम येतो, पण प्रकृती बिघडल्यास घाम येणे बंद होऊन त्वचा कोरडी आणि गरम पडते. थकवा आणि चक्कर :– प्रचंड अशक्तपणा जाणवणे, चक्कर येणे किंवा शुद्ध हरपणे. डोकेदुखी आणि मळमळ :– तीव्र डोकेदुखी होणे, उलट्या होणे किंवा मळमळणे. स्नायूंचे पेटके :– हातापायाच्या स्नायूंमध्ये तीव्र कळा येणे. वाढलेले तपमान :– शरीराचे तापमान खूप वाढणे.

पुरेसे पाणी प्या. ताक, लिंबू पाणी, नारळ पाणी असे द्रव पदार्थ घ्या. प्रवास करताना पिण्याचे पाणी सोबत ठेवा. लहान मुले, गरोदर माता आणि वृद्ध नागरिक संवेदनशील असल्याने त्यांची जास्त काळजी घ्यावी. चप्पल न घालता उन्हात चालणे टाळा. लहान मुलांना आणि पाळीव प्राण्यांना आत ठेवून गाडी बंद करणे टाळा. सामूहिक मेळावा/क्रीडा कार्यक्रम या ठिकाणी पाण्याची सोय असेल, थेट सूर्यप्रकाशाशी संपर्क नसेल याची खबरदारी घ्यावी. आपल्या दैनंदिन जीवनशैलीत साधेसोपे, छोटे बदल करून नागरिकांनी काही आवश्यक गोष्टींचे पालन करावे आणि उष्माघातसंदर्भात लक्षणे आढळून आल्यास आपल्या जवळच्या महानगरपालिका नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व रुग्णालयातून उपचार घ्यावेत, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## रानसई आदिवासी वाड्यांमध्ये पाणीटंचाई

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील रानसई येथील आदिवासी वाड्यांना मे महिन्यातील उन्हाच्या तडाख्यात पाणीटंचाई जाणवू लागली आहे. त्यामुळे रानसई येथील आदिवासी महिला व पुरुषांना पायपीट करून पाणी आणावे लागत आहे.

रानसई ग्रामपंचायत हद्दीतील भुऱ्याचीवाडी व खैरकाठीवाडी या दोन वाड्यांना प्रामुख्याने पाणीटंचाई मे महिन्याच्या प्रारंभीच जाणवू लागल्याने ही समस्या अधिक गंभीर बनली आहे. सध्या मे महिन्यात सर्वत्र लग्न सोहळ्यांची धामधूम सुरू झाली आहे. ठाकूर आदिवासी समाजातही मुला–मुलींच्या विवाहाचे आयोजन करण्यात आले आहे. पाणीटंचाईमुळे येथील आदिवासी हैराण झाले असून टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची मागणी होत आहे.

## हृदयविकारानंतर महिलेला वाचवण्यात डॉक्टरांना यश

**पनवेल : वार्ताहर**

छातीत दुखत असल्याची तक्रार घेऊन वाशीतील न्युईरा हॉस्पीटलमध्ये दाखल झालेल्या ४८ वर्षीय महिलेला अचानक कार्डिॲक अरेस्ट आला आणि जवळपास ५० मिनिटे तिच्या हृदयाचे ठोके पूर्णपणे थांबले होते. मात्र, डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि त्वरित सीपीआर आणि अँजिओप्लास्टीमुळे तिचे प्राण वाचवण्यात यश आले. या घटनेमुळे तिला अक्षरशः नवे आयुष्य मिळाले.



वाशीतील गृहिणी मेहरबी यांना २३ तासांपासून छातीत दुखणे, अस्वस्थता जाणवणे आणि अतिप्रमाणात घाम येणे अशा तक्रारी सतावत होत्या, जे हृदयविकाराच्या झटक्याची लक्षणं मानली जातात. जेव्हा त्या रुग्णालयात दाखल झाल्या तेव्हा सुरुवातीला त्यांचे ठोके आणि रक्तदाब स्थिर होता. त्यानंतर तत्काळ ईसीजी करून आवश्यक औषधोपचार सुरू करण्यात आले. काही मिनिटांतच त्यांची प्रकृती अचानक खालावली. त्या बेशुद्ध पडल्या आणि हृदयाचे ठोके व रक्तदाब पूर्णपणे बंद पडला,म्हणजेच त्यांना कार्डिॲक अरेस्ट आला. यावेळी प्रसंगावधान राखत तत्काळ सीपीआर सुरू करण्यात आला. रुग्णाला इंट्युबेट करून व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. दरम्यान, मॉनिटरवर जीवघेणा व्हेंट्रिक्युलर टॅकिकार्डिया (VT) असा हृदयाचा अनियमित ठोका दिसून आला. डॉक्टरांनी अनेक वेळा डीसी शॉक (defibrillation) दिले तसेच आपत्कालीन औषधं दिली.गंभीर परिस्थिती असूनही डॉक्टरांच्या टीमने जवळपास ४५ ते ५० मिनिटे अखंड सीपीआर सुरू ठेवला. अखेर रुग्णाच्या ऱ्हदयाचे ठोके आणि रक्तदाब पुन्हा सुरू झाले. त्यानंतरही तिला ट्रिपल इनोट्रोपिक सपोर्टची गरज होती.

या प्रकरणाबाबत माहिती देताना डॉ. गौरव सुराणा (ऱ्हदयविकार तज्ज्ञ, न्यूईरा हॉस्पिटल, वाशी, नवी मुंबई) यांनी सांगितले की, हे अत्यंत गंभीर प्रकरण होते, ज्यात प्रत्येक सेकंद महत्त्वाचा होता. रुग्ण १५ एप्रिल २०२६ रोजी दाखल झाला होता. सुरुवातीला हार्ट अटॅकची लक्षणे दिसत होती, जी बहुधा कोरोनरी आर्टरीतील अडथळ्यामुळे झाली होती. अशा परिस्थितीत हृदय प्रभावीपणे रक्त पंप करणे थांबवते आणि तातडीची मदत हाच जीव वाचवण्याचा एकमेव मार्ग असतो.ते पुढे सांगतात की, सीपीआरमुळे मेंदूसह महत्त्वाच्या अवयवांना रक्तपुरवठा सुरू ठेवता येतो. हृदयाचे ठोके अनियंत्रित झाल्यास, हृदय पुन्हा सामान्य लयीत (Normal Rhythm) आणण्यासाठी छातीवर दिला जाणारा विजेचा धक्का अशावेळी फायदेशीर ठरतो. जवळपास ५० मिनिटे चाललेले सीपीआर अत्यंत दुर्मिळ असून योग्य वेळी सीपीआर आणि शॉक दिल्यामुळे रुग्णाचा जीव वाचविणे शक्य झाले.रुग्ण स्थिर झाल्यानंतर तिला व्हेंटिलेटर आणि इनोट्रोपिक सपोर्टवर ठेवण्यात आले. त्यानंतर लगेचच कॅथ लॅबमध्ये नेऊन कोरोनरी अँजिओग्राफी करण्यात आली. यात हृदयाच्या रक्तवाहिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण झाला. अशावेळी तातडीने अँजिओप्लास्टी करून रक्तपुरवठा पूर्ववत करण्यात आला.

डॉ. सुराणा म्हणाले, अशा प्रकरणांमध्ये वेळीच उपचार करणे अत्यंत महत्त्वाचे असते. उशीर झाल्यास कायमस्वरूपी नुकसान किंवा मृत्यू होऊ शकतो. अँजिओप्लास्टीनंतर रुग्णाची प्रकृती हळूहळू सुधारू लागली आणि काही दिवसांत सपोर्ट कमी करता आला. उपचारानंतर रुग्णाला अतिदक्षता विभागात (ICU) ठेवण्यात आले. पुढील दोन दिवसांत तिची प्रकृती स्थिर झाली. इनोट्रोपिक सपोर्ट कमी करण्यात आला आणि तिला व्हेंटिलेटरवरूनही यशस्वीरीत्या काढण्यात आले. तिसऱ्या दिवशी ती स्वतः उभी राहू लागली. चौथ्या दिवशी तिला वॉर्डमध्ये हलवण्यात आले. सहाव्या दिवशी तिला पूर्णपणे स्थिर अवस्थेत घरी सोडण्यात आले.अशा प्रकरणांमध्ये वेळीच उपचार न मिळाल्यास मेंदूला ऑक्सिजनचा अभाव, हृदयाच्या कार्यक्षमतेचे कायमस्वरूपी नुकसान, वारंवार व्हेंट्रिक्युलर टॅकिकार्डियाचे झटके, न्यूरोलॉजिकल समस्या किंवा मृत्यू होण्याचा धोका वाढतो असे तज्ज्ञांनी स्पष्ट केले. हा प्रसंग आमच्यासाठी अत्यंत गंभीर होता. आम्ही तिला जवळपास गमावलेच होते, पण डॉक्टर व रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी हार मानली नाही. आम्ही संपूर्ण टीमचे मनापासून आभारी आहोत, अशी प्रतिक्रिया रुग्णांच्या कुटुंबीयांनी व्यक्त केली.

# जंजिरा किल्ल्याचा प्रवास धोकादायक!

## प्रवेशद्वारावर उतरतानाही पर्यटकांना करावी लागतेय कसरत

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुडमध्ये येणाऱ्या पर्यटकांसाठी राजपुरी ग्रामपंचायत हद्दीतील ऐतिहासिक जंजिरा किल्ला मुख्य आकर्षण आहे. हा किल्ला समुद्रात असल्याने या ठिकाणी जाण्यासाठी बोटीतून प्रवास करावा लागतो, पण बोटीतून बसून प्रवास करताना आणि किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर उतरताना पर्यटकांची तारांबळ उडते.

लाइफ सेफ्टी गार्ड घातल्याशिवाय बोटीत बसू नये असा नियम असताना तो धाब्यावर बसवून बहुतांश बोटचालक बिनधास्तपणे पर्यटकांना किल्ला पाहण्यासाठी घेऊन जात असतात. अशा वेळी मेरीटाईम बोर्डाचे अधिकारी करतात काय, हा मोठा प्रश्न येथे पडला आहे. सध्या पावसाळा जवळ आल्याने समुद्राला उधाण व मोठ्या भरतीमुळे मोठ मोठ्या लाटा निर्माण होत आहेत. शिडाच्या बोटी किल्ल्याजवळ आल्यास या मोठ्या लाटामुळे शिडाच्या बोटी सतत हेलकावे घेत असतात. त्यामुळे किल्ल्याजवळ उतरणे कठीण होते.

भरती व जोरदार हवेमुळे किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर मोठ मोठ्या लाटा उसळत असतात. यामुळे पर्यटकांना बोटीतुन उतरताना जीव मुठीत धरून उतरावे लागत आहे. ते पाहता येथे एखाद्या मोठी दुर्घटना घडण्याची वाट पाहिली जात आहे का, असा सवाल उपस्थित होत आहे.



राज्य शासनाने सागरमाला योजनेंतर्गत ९३.५६ कोटी खर्चून किल्ला च्या मागील बाजूस ब्रेकवॉटर आणि जेट्टी पर्यटकांच्या सुरक्षेसाठी बांधली आहे. हे काम दोन महिन्यांपूर्वी पूर्ण झाले असून जेट्टी पर्यटकांसाठी लवकरात लवकर खुली करावी, जेणेकरुन त्यांना किल्ल्यात जाणे सोपे, सुखकर आणि सुरक्षित होईल. प्रशासनाने याचा विचार करुन ही जेट्टी सुरू करावी, अशी मागणी पर्यटकांनी केली आहे.

> **शिडाच्या अथवा मशीन बोटीत बसलेल्या सर्व पर्यटकांना लाइफ जॅकेट घालण्याची सक्ती आम्ही करीत असतो. कोणालाही लाइफ जॅकेट घेतल्याशिवाय प्रवास करू दिला जात नाही. मुरूड तहसीलदार यांनीसुद्धा प्रत्यक्ष पाहणी केली आहे. मुख्य कार्यालयाकडून नवीन जेट्टी लोकार्पण सोहळा करण्याच्या हालचाली सुरू असून लवकरच याचे उद्घाटन होईल.**
> **-प्रभाकर पवार,**
> राजपुरी बंदर निरीक्षक

# इंदापुरात सकल हिंदू संमेलन

**माणगाव : प्रतिनिधी**

सकल हिंदू संमेलन समिती इंदापूर मंडळच्या वतीने आयोजित हिंदू संमेलन रायगड जिल्हा परिषद शाळा तळाशेतच्या प्रांगणात पार पडले. या संमेलनाला अभूतपूर्व प्रतिसाद लाभला.




व्यासपीठावर अध्यक्षस्थानी अविनाश मेथा, हिंदू संमेलन समिती अध्यक्ष उमाजी माडेकर, तर प्रमुख वक्ते म्हणून मुंबई येथून कवी, अभिनेते, निवेदक हेमंत बर्वे, आदर्श शिक्षिका उल्का माडेकर, डॉ.पराग पिंपळापुरे उपस्थित होते.

प्रमुख वक्ते हेमंत बर्वे यांनी हिंदुत्व या विषयावर मनोगत व्यक्त करताना सांगितले की, हिंदू धर्मियांनी जाती-पातीमध्ये न विभागता हिंदू म्हणून एकत्र येणे ही काळाची गरज आहे. हिंदू धर्मामध्ये अनेक उच्च परंपरा आहेत, त्या आपण जतन करून ठेवल्या पाहिजेत व आपल्या पुढच्या पिढीकडे संक्रमित केल्या पाहिजेत. आजची तरुणाई सोशल मीडियामध्ये अनाठायी हरवून जाऊ नये यासाठी हा हिंदू संस्कार आपण तरुणांपर्यंत नेला पाहिजे तसेच कुटुंबातील स्त्रियांनी या कामी पुढाकार घेऊन आपल्या पुढच्या पिढीवर लहानपणापासूनच उत्तम संस्कार करण्याची जबाबदारी स्वीकारावी आणि आपल्या देशाला परम वैभवावर नेण्यासाठी या पिढीला सुसंस्कारित करावे.

तरुणाई हे देशाचे खऱ्या अर्थाने बळ आहे, ती सशक्त झाली तर आपोआपच देश सशक्त होईल यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचेही बर्वे यांनी नमूद केले.

पंच परिवर्तन या विषयावर उल्का माडेकर यांनी विचार मांडताना आपल्या प्रभावी शैलीत कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, पर्यावरण, स्वतःची जाणीव व नागरिक शिष्टाचार या मुद्द्यांवर उदाहरणांसह स्पष्टीकरण देऊन ऊहापोह केला, तर डॉ.पराग पिंपळापुरे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला शतक पूर्ण झाल्याबद्दल संघाविषयी विवेचन केले.

यावेळी इंदापूर पंचक्रोशीतील त्या त्या गावांमध्ये अनेक वर्ष सामाजिक व सांस्कृतिक कार्य प्रभावीपणे करणाऱ्या व्यक्तींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. एमएसडब्ल्यू केलेली आदिवासी भगिनी मीना अशोक जगताप व बीएससी नर्सिंग उत्तीर्ण अस्मिता कृष्णा वाघमारे यांचाही सन्मान करण्यात आला.

माणगाव पंचायत समिती सभापती विलास शिंदे, उदय अधिकारी यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक संमेलन समिती कार्याध्यक्ष अमृत जैन यांनी व सूत्रसंचालन प्रणय इंगळे व हेमंत बारटक्के यांनी केले, तर वंदे मातरम या राष्ट्रीय गीताने समारोप करण्यात आला.

## एनएमएमएस परीक्षेत राजिप नवघर शाळेचे यश

**पाली : प्रतिनिधी**

नॅशनल मीन्स कम मेरिट स्कॉलरशिप (एनएमएमएस) परीक्षेत रायगड जिल्हा परिषद शाळा नवघरच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. शाळेतील एकूण चार विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले असून त्यापैकी सृष्टी गणेश अडसूळ व प्रचिती प्रल्हाद अडसूळ या दोन विद्यार्थिनींनी शिष्यवृत्ती पटकावली आहे.



विद्यार्थ्यांच्या या यशात त्यांच्या मार्गदर्शक शिक्षिका शीतल पाटील यांचा मोलाचा वाटा आहे. या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती नवघर मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि ग्रामस्थांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

## भाजपच्या विजयाचा अलिबागमध्ये जल्लोष

**अलिबाग : प्रतिनिधी**

पश्चिम बंगाल, आसाम तसेच इतर राज्यांतील निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाला मिळालेल्या विजयाचा आनंद अलिबाग शहरात उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, मिठाई वाटप करून तसेच जोरदार घोषणा देत विजयाचा जल्लोष केला.

यावेळी नगरसेवक ॲड. अंकित बांगेरा, अलिबाग शहराध्यक्ष राजेश प्रधान, युवा मोर्चा अध्यक्ष स्वप्नील गाडे, सुनील दामले, निखिल चव्हाण, जयेश पवार, कोटियन, इफ्तिकार अत्तर, पेरेकर, आदित्य जैन, आदित्य नाईक यांच्यासह इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



उपस्थितांनी एकमेकांना मिठाई भरवून विजयाचा आनंद व्यक्त केला आणि भविष्यातही पक्ष अधिक बळकट करण्याचा संकल्प व्यक्त केला.

## राष्ट्रीय जिल्हा पंचायत असोसिएशनच्या जिल्हाध्यक्षपदी अमित नाईक

**अलिबाग : प्रतिनिधी**

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांची देशव्यापी संघटना आलेली राष्ट्रीय जिल्हा पंचायत असोसिएशन आता रायगड जिल्ह्यातही सक्रिय होत आहे. संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी रायगड जिल्हा परिषदेतील राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रतोद अमित नाईक यांची निवड करण्यात आली आहे.

याबाबतचे पत्र जि.प. सदस्य नाईक यांना नुकतेच प्रदान करण्यात आले. यावेळी कैलास गोरे पाटील, राष्ट्रीय सल्लागार राहुल पिंपळे, राज्य संघटक आबासाहेब खारे उपस्थित होते.



संघटनेच्या वतीने राज्य सरकारकडे सदस्यांच्या विविध मागण्यांचा पाठपुरावा करण्यात येणार आहे. त्यासाठी लवकरच राज्यस्तरीय मेळावा आयोजित केला जाणार आहे.

# स्वच्छ, सुंदर रोहा ते शून्य कचऱ्याकडे वाटचाल!


## कुंडलिका नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठीही निधी उपलब्ध

**रोहा : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील क वर्गातील सर्वात मोठी ओळखली जाणारी रोहा अष्टमी नगर परिषदेने स्वच्छ रोहा सुंदर रोहा ही संकल्पना राबवत शून्य कचरा भविष्यातील धोरण साकारण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. नगराध्यक्ष वनश्री शेडगे व मुख्याधिकारी अजयकुमार एडके यांच्या मार्गदर्शनाखाली व संकल्पनेतून स्वच्छता मोहीम राबवत असताना जनजागृतीवर भर देण्यात येत आहे.

रोहा अष्टमी शहरात नगरपरिषदेच्या वतीने घरोघरी कचरा उचलण्यात येत आहे. महत्त्वाचे म्हणजे सातत्याने नागरिकांना ओला व सुका कचरा वर्गीकृत करण्याचे आवाहन केल्यानंतर नागरिकांचाही चांगला प्रतिसाद मिळत आहे.

रोहा शहरातून दोन टप्प्यात कचरा उचलला जातो. सकाळी ७.३० ते ११.३९, तर दुपारी २ ते ५.३० या दरम्यान कचरा उचलला जातो. ठेकेदारांच्या माध्यमातून दररोज उचललेला १२ ते १४ टन कचरा रेल्वे स्टेशनपलीकडे साडेतीन एकरात असलेल्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पात (डम्पिंग ग्राउंड) टाकला जातो. कचऱ्याचे विलगीकरण करण्यात येते, तर उर्वरित २० टक्के कचरा हा बायोमायनिंगलासाठी वापरण्यात येणार आहे. त्यासाठी प्रयत्न चालू आहेत.



### प्लास्टिक, धुरापासून होणार नागरिकांची सुटका

दरम्यान, नगर परिषद डम्पिंग ग्राउंडमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा होता. ठिकठिकाणी आग लागत होती. मोकाट गुरांचा व कुत्र्यांचा डम्पिंग ग्राउंड अड्डा बनला होता. अशावेळी नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी पुढाकार घेत शून्य कचऱ्याचा संकल्पना राबवण्यास सुरुवात केली. त्यामुळे या परिसरातील नागरिकांना प्लास्टिक व धुरापासून दिलासा मिळणार आहे.

घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पात मिक्सरमध्ये टाकून कचरा वर्गीकरण करण्यात येतो. कचरा वर्गीकरण झाल्यानंतर या ठिकाणी कचऱ्याचे विल्हेवाट लावण्यासाठी ट्रॅमेल मशीन, एक प्लास्टिक शडर मशीन, तर हजारडस्टसाठी बेलिंग मशीन आहे. रोहयात ओला कचरा यासाठी नियोजित खत प्रकल्प सुरू करण्यात येणार आहे.

सध्या मैला निवारण प्रक्रिया केंद्र सुरू असून त्यामध्ये ५ के एलडी मैलावर प्रक्रिया केली जाते, तर दुसरीकडे सांडपाणी प्रक्रिया केंद्रासाठी म्हाडा कॉलनीसमोर नदीकाठी काम सुरू आहे. यामध्ये पाच एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया होण्याची अपेक्षित आहे.

रोहा अष्टमी नगर परिषदेचे सांडपाणी थेट कुंडलिका नदीच्या पात्रात जात असल्याने ही नदी सातत्याने प्रदूषित होते. कुंडलिका नदीलगत ३६ कोटी खर्चून महत्त्वाकांक्षी संवर्धन प्रकल्प उभारल्यानंतर पुन्हा एकदा खासदार सुनील तटकरे यांनी निधी उपलब्ध करून दिला आहे. नदी संवर्धनासाठी पूर संरक्षक भिंत बांधणे, नदीतील गाळ सफाई करणे आदींसाठी १२.५ कोटींचा निधी उपलब्ध झाल्याची माहिती नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांनी दिली.

## देवळे धरणाची मंत्री गोगावलेंकडून पाहणी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील देवळे येथील धरण प्रकल्पाच्या कामाची राज्याचे मंत्री भरत गोगावले यांनी पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास पाहणी केली. या पाहणीदरम्यान त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कामाचा वेग वाढवण्याच्या तसेच गुणवत्तापूर्ण काम करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. याचवेळी उन्हाळी पाणी टंचाई भेडसावणाऱ्या १५ गावांना दिलासा देण्यासाठीही मंत्री गोगावले यांनी स्पष्ट निर्देश दिले.



पोलादपूर तालुक्यातील देवळे धरण प्रकल्पाच्या परिसरातील देवळे, करंजे, नाणेघोळ, पितळवाडी, चाळीचा कोंड, वाकण, घागरकोंड अशा डोंगराळ भागातील गावांमध्ये अनेक वर्षांपासून पाण्याचा तीव्र तुटवडा भासत आहे. विशेषतः उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असते. शेतीसाठीदेखील पाणी उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान आहे. त्यामुळे 'धरण उशाशी आणि कोरड घशाशी' अशी अवस्था अनुभवणाऱ्या परिसरातील ग्रामस्थांनी तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांनी ही बाब मंत्री गोगावले यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यामुळे मंत्री गोगावले यांनी तातडीने आपल्या मोटारींचा ताफा देवळे धरण प्रकल्पाकडे वळवून संबंधित ठेकेदार मोरे आणि पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली आणि परिसरातील गावांतील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याकामी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

पाहणी दौऱ्यात रायगड जिल्हा परिषदेचे अर्थ शिक्षण व क्रीडा सभापती चंद्रकांत कळंबे, जिल्हा परिषद सदस्य डॉ. निलेश कुंभार, पंचायत समिती सदस्य अनिल दळवी, शिवसेना तालुकाप्रमुख निलेश आहिरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक लक्ष्मण मोरे आदी उपस्थित होते. लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ व शेतकरी तसेच प्रशासनाच्या समन्वयातून हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करीत जनतेला दिलासा देण्याची ग्वाही मंत्री गोगावले यांनी दिली.

## 'काळी मैना' ठरतेय आधार


### तळा तालुक्यातील आदिवासी समाजाला रोजगार

**तळा : संध्या पिंगळे ठाकूर**

तळा तालुका हा दुर्गम तालुका असून डोंगराळ भागात काळी मैना अर्थात करवंदांचे पीक मोठ्या प्रमाणात आले आहे. आता हे आदिवासी समाजाला आधार ठरत आहे व आर्थिक लाभ चांगला होताना पहावयास मिळत आहे. सध्या ही करवंदे बारामती, पुणे इत्यादी शहरांकडे विक्रीसाठी रवाना होत होत आहे.

फेब्रवारी, मार्च, एप्रिलमध्ये काजू बिया विकून आदिवासी समाज आपला उदरनिर्वाह भागवत होते, तर मे महिन्यात डोंगराचा रानमेवा व काळी मैना विकून ते चरितार्थ चालवत असून यातून चांगला आर्थिक लाभ मिळत आहे.

आदिवासी कुटुंब दिवसभर रानोमाळ धावून २० ते २५ किलो करवंद गोळा करून आणतात आणि सायंकाळी संगम पुलाशेजारी ५० रुपये प्रति किलो दराने त्याची विक्री केली जाते. एक ते दोन दिवसांनी अंदाजे १५०० किलो करवंद बाहेरगावी विक्रीसाठी रवाना होत आहे.



**औषधी गुण, पौष्टिक सत्त्व**

*डोंगराच्या काळ्या मैनेमध्ये औषधी गुण असून ते पौष्टिक सत्व असणारे एक फळ आहे. डोंगर ओडके बोडके होत असताना व करवंदाच्या झुडपांचे प्रमाण कमी झाले असतानाही आजही तळा तालुक्यातून दुसऱ्या शहरांमध्ये करवंद जात आहेत हे विशेष.*

विक्री करण्यास आलेल्या आदिवासी बांधवांशी संवाद साधला असता ते म्हणाले की, आम्ही कुटुंबातील तीन ते चार माणसे जंगलात जाऊन अंदाजे २० ते २५ किलो करवंद गोळा करतो. त्यापासून १००० रुपये मिळतात अशा प्रकारे उन्हाळ्यात रानमेवा विकून आर्थिक लाभ होत आहे.

## कापडे बुद्रुक येथे आकार प्रतिष्ठानतर्फे पुरस्कार वितरण

**पोलादपूर : प्रतिनिधी**

संस्थापक अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांच्या प्रमुख उपस्थितीत कोकण मराठी साहित्य परिषदेची १९९७ साली सोनपंखीकार कवी वसंत पालकर यांच्या अध्यक्षतेखाली पोलादपूर तालुक्याची शाखा सुरू झाल्यानंतर जयंत देशपांडे व शैलेश पालकर यांनी कोमसाप पोलादपूरचे अध्यक्षपद भूषविले. याबद्दल कापडे बुद्रुक येथे आकार प्रतिष्ठानतर्फे विविध पुरस्कार वितरण सोहळ्यात त्यांच्यासह वरदायिनी माध्यमिक शाळा, माजी शिक्षकांसह अनेकांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास कोमसापचे जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ, राधा प्रकाशनचे प्रकाशक यादवेंद्र सपकार, उरणमधील उच्च माध्यमिक शाळेचे



ल.बु. पाटील यांच्यासोबत इतिहासतज्ज्ञ सुखद राणे, आकार प्रतिष्ठान, पोलादपूरचे अध्यक्ष अजय सलागरे, उपाध्यक्ष रामदास सकपाळ, सचिव राजाराम शेलार, सहसचिव ज्ञानेश्वर उतेकर, खजिनदार रविकांत सकपाळ, सहखजिनदार सुनील चव्हाण, आकार प्रतिष्ठनचे विश्वस्त उपस्थित होते.

पोलादपूर गौरव पुरस्कार २०२५-२६ अंतर्गत विविध क्षेत्रांतील एकूण ११ मानकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यामध्ये आदर्श साहित्यसेवक भाषा गौरव पुरस्कार जयंत देशपांडे पोलादपूर तालुका आदर्श पत्रकार शैलेश पालकर या कोमसाप पोलादपूरच्या माजी अध्यक्षांसह आदर्श शिक्षक रत्न पुरस्कार (प्राथमिक विभाग) सुदर्शना मोरे, आदर्श शिक्षक रत्न पुरस्कार (माध्यमिक विभाग) सुनील शिंदे, आदर्श शाळा विशेष गुणवत्ता पुरस्कार (माध्यमिक विभाग) श्री वरदायनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कापडे बुद्रुक, आदर्श शाळा विशेष गुणवत्ता पुरस्कार (प्राथमिक विभाग) रायगड जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा चांभारगणी बुद्रुक, आदर्श कीर्तन सेवा प्रबोधन रत्न पुरस्कार अनंत महाराज चव्हाण, आदर्श शासकीय अधिकारी सेवा रत्न पुरस्कार मनीष योगी, आदर्श शेतकरी कृषीरत्न पुरस्कार भगवान अहिरे यांचा पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला.

यावेळी उरणमधील उच्च माध्यमिक शाळेचे माजी मुख्याध्यापक ल.बु. पाटील यांच्या हस्ते कापडे हायस्कूलचे महाडस्थित माजी मुख्याध्यापक अजितकुमार जंगम यांच्या 'आपलं कोकण' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी पोलादपूर तालुक्यात कोकण मराठी साहित्य परिषदेची शाखा उघडण्यात यावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. 'कोमसाप'चे जिल्हाध्यक्ष संजय गुंजाळ यांनी मधुभाई कर्णिक यांच्या वाढदिवसाच्या औचित्याने पोलादपूर कोमसाप शाखा सुरू करण्यासंदर्भात विचार मांडला गेल्याने लवकरच ही शाखा सुरू झाल्याची गोड बातमी अजितकुमार जंगम व सहकारी देतील, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी कापडे येथील वरदायिनी विद्यामंदिरच्या माजी शिक्षकांचा सत्कार आकार प्रतिष्ठानतर्फे करण्यात आला.

# चेन्नई प्ले ऑफच्या दिशेने

## दिल्लीवर मात



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवरील संथ खेळपट्टीवर संजू सॅमसन आणि युवा बॅटर कार्तिक शर्माच्या दमदार खेळीच्या जोरावर चेन्नई सुपर किंग्सच्या संघाने दिल्ली कॅपिटल्सला एकतर्फी पराभूत केले. दिल्लीच्या संघाने दिलेल्या १५६ धावांचा पाठलाग करताना चेन्नई सुपर किंग्सने आठ विकेट्स आणि १५ चेंडू राखून विजय नोंदवला.

या विजयासह चेन्नई सुपर किंग्सच्या संघाने आपल्या खात्यात १० गुण जमा करत प्लेऑफची आपली दावेदारी आणखी मजबूत केली आहे. दुसरीकडे दिल्ली कॅपिटल्सच्या संघासाठी समीकरण आणखी आव्हानात्मक झाले आहे. आता दिल्ली संघासाठी उर्वरित प्रत्येक सामना 'करो वा मरो'ची लढत असेल.

दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेलने नाणेफेक जिंकून पहिल्यांदा फलंदाजी करण्याचा घेतलेला निर्णय फसवा ठरला. पथुम निसंका १९ (१५), लोकेश राहुल १२ (१३), नितीश राणा १५ (१३) आणि करुण नायर १३ (१३) या आघाडीच्या फळीतील फलंदाजांना मोठी खेळी करण्यात अपयश आले. आपला निर्णय सार्थ ठरवण्यासाठी अक्षर पटेललाही बॅटिंगमध्ये धमक दाखवता आली नाही. संघ अडचणीत असताना ट्रिस्टन स्टब्स ३८ (३१) आणि समीर रिझवीने शेवटपर्यंत मैदानात थांबतून २४ चेंडूत केलेल्या ४० धावांच्या नाबाद खेळीच्या जोरावर दिल्ली संघाने निर्धारित २० षटकात १५५ धावा केल्या, पण याचा बचाव करताना दिल्लीच्या गोलंदाजांना कमाल दाखवता आली नाही.

जिथे दिल्लीकर फलंदाजांनी नांगी टाकली तिथे संजू सॅमसन याने आपल्या फलंदाजीतील क्लास दाखवला. कर्णधार ऋतुराज गायकवाड अवघ्या सहा धावा करून परतल्यावर उर्विल पटेलच्या रुपात चेन्नई सुपर किंग्सला दुसरा धक्का बसला. तो नऊ चेंडूत १७ धावा करून बाद झाला, पण त्यानंतर संजू सॅमसन आणि युवा बॅटर कार्तिक शर्मा जोडी जमली. संजूने ५२ चेंडूत सात चौकार आणि सहा षटकारांसह ८७ धावांची नाबाद खेळी केली. कार्तिकने ३१ चेंडूत ४१ धावांची नाबाद खेळी करत संघाच्या विजय निश्चित केला.

# आशियाई सवात चॅम्पियनशिपमध्ये भारताचा डंका

## विजयी खेळाडूंचा पनवेलमध्ये सत्कार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नेपाळमधील काठमांडू युनिव्हर्सिटी, धुलीखेल येथे नुकत्याच पार पडलेल्या सातव्या आशियाई व इंटरनॅशनल सवात चॅम्पियनशिप २०२६मध्ये भारतीय खेळाडूंनी देदीप्यमान कामगिरी करत आंतरराष्ट्रीय स्तरावर तिरंगा अभिमानाने फडकवला. या स्पर्धेत पदकांची लयलूट करणाऱ्या मास्टर भूपेंद्र मार्शल आर्ट स्पोर्ट्स अँड फिटनेस अकॅडमीच्या (एमबीएमए) आणि महाराष्ट्राच्या सर्व विजयी खेळाडूंचा ५ मे रोजी पनवेलमध्ये सत्कार समारंभ पार पडला.

या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताकडून एकूण ७१ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये महाराष्ट्रातील २४ खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत दोन सुवर्ण, सात रौप्य आणि १५ कांस्य पदके जिंकली. विविध राज्यातील खेळाडूंच्या एकत्रित योगदानामुळे भारताने आशियाई स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाची ट्रॉफी पटकावण्याचा बहुमान मिळवला.

महाराष्ट्राच्या गार्गी कुलकर्णी आणि अंजली चव्हाण यांनी सुवर्णपदकाला गवसणी घातली. आकांक्षा भालेकर, आर्या पवार, समृद्धी जुगदार, शिवम पाटील, श्रुतिका जाधव, वैष्णवी शिंदे आणि सार्थक महामुनी यांनी रौप्य पदके पटकावली, तर ऐश्वर्या नायक, अस्मि पाटील, वरद शेटे, मकरंद जुगदार, ध्रुव दिघाडे, अविर बनसोडे, प्रमोद ठोंबरे, आदित्य खंडीझोड, यश मोरे, ध्रुव कोलतेकर, ईश्वरी डेरे आणि स्वयम् शिंदे यांनी कांस्यपदक जिंकले. दरम्यान, हिमालयन इंटरनॅशनल सवात चॅम्पियनशिपमध्ये सिद्धी जोगदार, मंथन रोटे आणि आराध्या भोसले यांनी कांस्यपदकाची कमाई केली.

पनवेल येथील खांदा कॉलनीतील सीकेटी कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात अकॅडमीच्या खेळाडूंचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. या यशानंतर खेळाडूंची विजयी मिरवणूक काढण्यात आली, ज्यामध्ये स्थानिक नागरिक, क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या यशात खेळाडूंसोबतच प्रशिक्षक व पंचांचेही मोठे योगदान राहिले. राष्ट्रीय संघ प्रशिक्षक सुहास धाईंजे, आशिया पंच राहुल पवार आणि भूपेंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी हा विजय साकारला तसेच गायकवाड, धनेशा शिंगोटे, राहुल पवार आणि सुशांत पोळ यांनी जज व रेफ्री म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट जबाबदारी पार पाडली.

आशियाई स्तरावरील या यशानंतर आता भारतीय खेळाडूंचे लक्ष्य सप्टेंबर २०२६मध्ये फ्रान्स येथे होणाऱ्या सवात वर्ल्ड चॅम्पियनशिपकडे लागले असून आशियाई विजयी खेळाडूंवर सर्व स्तरांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# ॲथलेटिक्स ऋतुजा पातेरेला रौप्यपदक



**पाली : प्रतिनिधी**

मूळची सुधागड तालुक्यातील रामवाडी गावची आणि ठाण्यातील संभाजीनगर भागात राहणारी ऋतुजा राजू पातेरे या ॲथलेटिक्सपटूने नाशिक येथे झालेल्या राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धेत २००, ४०० आणि ८०० मीटर धावण्याच्या शर्यतीत रौप्यपदके पटकावली. याशिवाय बुलडाणा येथे झालेल्या क्रॉस कंट्री १० किमी स्पर्धा प्रकारात विजेतेपद पटकाविले.

या यशाचे श्रेय ऋतुजाने सिनियर कोच दत्ता चव्हाण आणि ट्रॅक ॲन्ड फिल्ड मार्शल स्वप्नील चव्हाण यांना दिले. तेच आपले ऊर्जा व प्रेरणास्थान असल्याचे सांगितले तसेच भविष्यात विजयाची अनेक शिखरे गाठण्यासाठी अधिक परिश्रम घेण्याची मानसिक व शारीरिक तयारी असल्याचेही तिने नमूद केले.

# आयसीसी टी-२० क्रमवारीत भारतीय संघ अव्वल स्थानी कायम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसीने पुरुषांची नवीन टी-२० सांघिक क्रमवारी जाहीर केली. या यादीत भारत अव्वल स्थानी कायम आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारताने २७५ रेटिंग गुणांसह अव्वल स्थान पटकावले आहे. भारताची आघाडी थोडी कमी झाली असली तरी संघ दुसऱ्या स्थानावरील इंग्लंडच्या (२६२) खूप पुढे आहे, तर ऑस्ट्रेलिया २५८ गुणांसह तिसऱ्या स्थानी आहे.

या नवीन अपडेटमध्ये मे २०२५नंतर खेळल्या गेलेल्या सामन्यांना १०० टक्के आणि गेल्या दोन वर्षांतील सामन्यांना ५० टक्के महत्त्व देण्यात आले आहे. हे अपडेट टी-२० क्रिकेटमधील भारताच्या सातत्यपूर्ण कामगिरीचे द्योतक आहे. भारताने या फॉरमॅटमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे. टीम इंडियाने २०२४ आणि २०२६मध्ये सलग दोनदा पुरुषांचा टी-२० विश्वचषक जिंकला. दरम्यान, अव्वल सात संघांच्या क्रमवारीत कोणताही बदल झालेला नाही.



# गुंडगे संघ केपीएलचा मानकरी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरात आमदार महेंद्र थोरवे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कर्जत प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत आई एकविरा ब्लास्टर्स संघ गुंडगे यांनी विजेतेपद पटकावले. व्हीएच ग्रुप संघ उपविजेता ठरला.

कर्जत शहरातील पोलीस ग्राउंडवर नगरसेवक संकेत भासे यांनी शिवसेना व युवासेना यांच्या सहकार्याने आयोजित या बॉक्स क्रिकेट स्पर्धेत तब्बल ४० संघांनी सहभाग घेतला. एकूण ९५ सामने रंगले. या सोहळ्याला आमदार महेंद्र थोरवे यांनी हजेरी लावत खेळाडूंना प्रोत्साहन दिले. यावेळी प्रसिद्ध क्रिकेटपटू केतन म्हात्रे यांनी उपस्थित राहून खेळाडूंना मार्गदर्शन व शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेदरम्यान प्रेक्षकांसाठी विविध उपक्रमही आयोजित करण्यात आले होते. लकी ड्रॉच्या माध्यमातून पैठणी, स्पोर्ट्स सायकल, एसी आणि फ्रिज यांसारखी आकर्षक बक्षिसे देण्यात आली. त्यामुळे प्रेक्षकांचा सहभाग अधिक रंगतदार झाला तसेच फॅन्सी ड्रेस स्पर्धेत सहभागी झालेल्या कलाकारांनी विविध वेशभूषांमधून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

तोषवी इलेव्हन केएफ बॉईजने तृतीय आणि मेनू रायसिंग स्टार्सने चतुर्थ क्रमांक पटकावला. स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल समीर शिंदे याला मालिकावीर पुरस्कारासाठी आकर्षक चषकासह इलेक्ट्रिक स्कुटी प्रदान करण्यात आली.

# राष्ट्रीय तायक्वांदो पंच परीक्षेसाठी सुभाष पाटील परीक्षकपदी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडिया व तायक्वांदो असोसिएशन ऑफ उत्तराखंडमार्फत इनडोअर स्टेडियम विदिशा (मध्य प्रदेश) येथे ८ ते १० मेदरम्यान राष्ट्रीय पंच सेमिनार व पंच परीक्षा होणार आहे. या परीक्षेसाठी परीक्षक म्हणून रायगडचे सुपुत्र तायक्वांदो आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक तसेच कॉमनवेल्थ तायक्वांदो रेफरी युनियनचे सदस्य सुभाष पाटील यांची निवड झाली आहे.

सुभाष पाटील हे सातवी डिग्री ब्लॅक बेल्ट व आंतरराष्ट्रीय पंच आहेत. त्यांनी आतापर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पंच म्हणून कामगिरी केली आहे. अनेक देशात जाऊन सेमिनार केले आहेत. ते प्रथम श्रेणीचे आंतरराष्ट्रीय पंच आहेत.

पाटील हे ७ मे रोजी विदिशा येथे रवाना होणार आहेत. त्यांना या स्पर्धेसाठी तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई), रायगड तायक्वांदो असोसिएशनचे पदाधिकारी यांच्यासह पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, महापौर नितीन पाटील, नगरसेवक परेश ठाकूर आदी मान्यवरांकडून शुभेच्छा देण्यात आल्या.



# आयपीएलचा अंतिम सामना बंगळुरूऐवजी अहमदाबादमध्ये

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६ आता अखेरच्या टप्प्यात आहे. हंगामातील अखेरचा साखळी सामना २४ मे रोजी खेळला जाणारा आहे. अशातच बीसीसीआयकडून महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. २०२६चा अंतिम सामना बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी स्टेडियमऐवजी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळला जाणार आहे.

आयपीएल २०२६च्या प्लेऑफची सुरुवात २६ मेपासून होणार आहे. आयपीएल २०२५च्या फायनलमध्ये बंगळुरुने पंजाबचा सहा धावांनी पराभव करत पहिल्यांदा आयपीएलचे विजेतापद झळकवले होते. यामुळे आयपीएलच्या नियमानुसार गतविजेत्या टीमच्या घरच्या मैदानावर पुढच्या हंगामाचा अंतिम सामना खेळला जातो, पण स्थानिक संघटना आणि प्रशासकीय यंत्रणांकडून करण्यात आलेल्या मागण्या या बीसीसीआयच्या नियमावलीच्या बाहेर होत्या. त्यामुळे अंतिम सामन्याचे ठिकाण बदलण्यात आले आहे.


॥ श्री गजानन प्रसन्न ॥

**पुण्यतिथी समारंभ**

आपणांस कळविण्यात येत आहे की,
आमच्या येथे सालाबाद प्रमाणे
**स्वर्गीय जनार्दन आत्माराम भगत साहेबांची ३८ वी पुण्यतिथी समारंभ** मिती वैशाख कृ. ५, शके १९४८,
गुरुवार दि. ०७/०५/२०२६ रोजी सकाळी ०९.००
वाजता **मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब** यांच्या शुभहस्ते
होणार आहे, तरी आपण कार्यक्रमास
अगत्य येण्याचे करावे, ही विनंती.

**आपले नम्र**
श्री. प्रकाश जनार्दन भगत
श्री. अजय जनार्दन भगत
श्री. संजय जनार्दन भगत

**ठिकाण**
भगत साहेब निवास स्थान,
मु. शेलघर, पो. गव्हाण, ता. पनवेल,
जि. रायगड.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com